# An evening in Aurangabad..

# AURA 2014
## AURANGABAD



Regular concert series of Indian Classical dance showcasing the rich and diverse heritage of Aurangabad region.

**Every Friday, Saturday, Sunday; 7.30-8.30 pm at MAHAGAMI Gurukul, MGM, Aurangabad.**

A unique dance concert series named AURA-Aurangabad is being launched which aims to showcase the rich and diverse heritage of Aurangabad through Indian classical dance performances. This series catering to the cultural quest of the tourists and guests visiting the city being presented at MAHAGAMI will bring to life this wide spectrum of legends, master-pieces and monuments through the Indian classical dance forms like Kathak, Odissi, Bharatnatyam, Mohiniattam, Kuchipudi, etc. Curated by

Parwati Dutta
(Director, MAHAGAMI)

presented by
MAHĀGĀMĪ

supported by
CII
Confederation of Indian Industry

Platinum sponsor
Bagla Total Solution

Silver sponsor
Endress+Hauser
People for Process Automation



**For bookings or enquiry,**
call +91 9372093189, +91 240 2484919.
(Time - 10.00 am to 6.00pm)
Information also available in Local Hotels,

Follow us on Facebook
AURA-Aurangabad

# Aura Aurangabad 2014-15

07 Nov.14 | KathakSeema Mehta | Chhandam Nritya Bharati

08 Nov.14 | KATHAK | Prajakta Atre

09 Nov.14 | KATHAK MAHAGAMI

14 Nov.14 | BHARATANATYAM | Priya Joshi

15 Nov. 14| BHARATANATYAM | Priya Joshi

16 Nov.14 | MOHINIYATTAM | Sujatha Nair

21 Nov. 14 | BHARATANATYAM | Sandhya Purecha

22 Nov. 14 | BHARATANATYAM | Sandhya Purecha

23 Nov. 14 | BHARATANATYAM | Sandhya Purecha

28 Nov.14 | ODISSI | Daksha Mashruwala Kaishiki | Nrityabhasha

29 Nov.14 | ODISSI | Daksha Mashruwala Kaishiki | Nrityabhasha

30 Nov.14 | Kathak| MAHAGAMI

05 Dec. 14 | ODISSI | Anu Narayan

06 Dec.14 | BHARATANATYAM | Deepa Kartha | Rudra Dance Ensemble

07 Dec.14 | BHARATANATYAM | Deepa Kartha | Rudra Dance Ensemble

12 Dec.14 | Mohiniyattam Deepa | Kartha Rudra Dance Ensemble

13 Dec.14 | Tentative date | Vidyagauri Adkar

19 Dec. 14 | BHARATANATYAM | Arundhati Patwardhan | Kalavardhini Charitable Trust

20 Dec.14 | KUCHIPUDI | Deepika Reddy

21 Dec. 14 | BHARATANATYAM | Parimal Phadke

26 Dec.14 | KATHAK | Varadha Phadke | bedekar and group

27 Dec. 14 | KATHAK | Tejaswini Sathe

28 Dec.14 | KATHAK | Abha Auti

02 Jan. 14 | Odissi | Subhada Varadkar

03 Jan. 14 | Bharatnatyam | Archita Mehta

04 Jan. 14 Odissi | Subhada Varadkar

09 Jan.14 | Bharatnatyam | Anand Satchidanand

This series catering to the cultural quest of the tourists and guests visiting the city being presented by Mahagami will bring life to this wide spectrum of legends, masterpieces and monument through the Indian classical dance forms like Kathak, Odissi, Bharatnatyam.



Lokmat Times
www.epaper.lokmat.com/lokmattimes/
AURANGABAD, SATURDAY 8 NOVEMBER 2014
Aurangabad FIRST
PAGE 3



Artistes perform during the Aurangabad Aura, a dance series hosted by Mahagami and CII, that was inaugurated on Friday. -LT photo by Feroz Khan

# Aura A'bad dance series enthrals audience

LOKMAT NEWS NETWORK
AURANGABAD, NOV 7

'Aura Aurangabad,' a dance series organised jointly by Confederation of Indian Industries (CII) and Mahagami received an overwhelming response from the dance lovers.

A series of 30 dances was inaugurated on Friday. Aura Aurangabad has been organised especially to entertain the foreign tourists, who come to Aurangabad.

Mahagami director Parvati Dutta, CII zonal council chairman Prashant Deshpande and others were present.

Today the tale of Radha-Krishna love was narrated through Kathak dance form. Dancers Seema Mehta, Raina Gagrat and Sonal Mayani, the disciples of Chitresh Das from Mumbai enthralled the audience with their unique dancing style.

Initially, the artists showcased the gigantic incarnation of Brahma, Vishnu and Mahesh. Seema Mehta bowed to the Yogis and Sadhus meditating in Himalaya for years through her performance of 'Kathak Yoga.'

Tomorrow, the second dance of the series will be performed. Sukanya Walaskar conducted the proceedings of the function.

2 TIMES CITY
SUNDAY TIMES OF INDIA, AURANGABAD DECEMBER 7, 2014

# Duo enthral city with Odissi performance

TIMES NEWS NETWORK

**Aurangabad:** Anu Narayan and Sangeetha Rajan, disciples of Guru Debi Basu, leading exponent of the Odissi dance form enthralled city audiences on Friday evening at the Mahatma Gandhi Sangeet Academy premises.

"Anu has presented solo recitals in many dance festivals in India. Sangeetha has performed in various countries like the US, Japan, China and the Maldives," Mahagami said in a statement issued on Saturday. The concert in Aurangabad was orgnaised as part of the AURA -Aurangabad organised by Mahagami.

The duo presented Simhandra Pallavi, which is an expression of pure joy expressed by the dancer and experienced by the spectator. Pallavi highlights the unique stances of Odissi like Chauk, Tribhangietc, recreating sculpturesque poses found abundantly in the temples of Orissa.

They also presented Sabhinaya, which is an item where expressive dance is interwoven with pure dance. The protagonist of this piece is a village girl who sees Krishna for the first time and is mesmerised by the dark form.

She shares this enchantment with her friend only to be lovingly teased by her. The theme is simple and the movements lively, it said.

They also performed Ardhaneeshwar Stuti, which is a concept that celebrates the duality of life, of creation and destruction. The masculine Shiva and feminine Parvati are revered together in this form, as their individual identities merge into one whole.

The Mahagami said that a unique dance concert series named AURA-Aurangabad has been launched by the guru Parwati Dutta, director of Mahagami, every Friday, Saturday, Sunday with an aim to showcase the rich and diverse heritage of Aurangabad through Indian classical dance performances.

Anu Narayan and Sangeeta Rajan disciples of Guru Debi Basu, leading exponent of Odissi dance form enthralled city audiences at the Mahagami premises. The duo presented Simhandra Pallavi, which is an expression of pure joy expressed by the dancer and experienced by the spectator.

Lokmat Times
www.epaper.lokmat.com/lokmattimes/
AURANGABAD, MONDAY 8 DECEMBER 2014
PAGE 3



Sarita K and Deepa Karta from Chennai presented a superlative Bharatnatyam performance in the Aura dance series of Mahagami in Aurangabad on Sunday.
LT photo by Feroz Khan

महाराष्ट्र टाइम्स, औरंगाबाद ■ सोमवार, २९ डिसेंबर २०१४ २



## औरा-औरंगाबादचे वेगळेपण



महात्मा गांधी मिशनच्या महागामी द्वारे २०१४ मध्ये औरा-औरंगाबादद्वारे शास्त्रीय नृत्य व परंपरेच्या मैफली 'औरा-औरंगाबाद'या व्यासपीठावर सुरू केल्या. नृत्य परंपरा, पर्यटनवाढ आणि विकास हा उद्देश या मैफलींचा होता. पार्वती दत्ता यांनी हा अनोखा उपक्रम सीआयआयच्या मदतीने सुरू केला. याला वर्षभर चांगला प्रतिसाद मिळाला. या उपक्रमात देशविदेशात प्रसिद्ध नृत्य कलाकारांच्या नृत्याचा औरंगाबादकरांना आस्वाद घेता आला.

दिव्य मराठी **दिव्य सिटी**

औरंगाबाद, सोमवार, १ डिसेंबर २०१४



**औरा औरंगाबाद!**

मुंबई येथील कैशिकी नृत्यभाषा अकादमीच्या दक्षा मशरूवाला यांच्या शिष्यांनी औरा-औरंगाबाद नृत्यशृंखलेच्या ११ व्या पुष्पात ओडिसी नृत्याचे सौंदर्यपूर्ण सादरीकरण केले. विलक्षण अदाकारी आणि नजाकतपूर्ण अभिनयसौंदर्याच्या या नृत्याविष्काराने रसिकांना मोहिनी घातली.

■ वृत्त पान ३

सोमवार, १७ नोव्हेंबर २०१४

**पुण्य नगरी**

**औरंगाबाद वृत्तवेध**



## शारंगदेवमध्ये सहाव्या पुष्पात 'मोहिनी अट्टम्'





एमजीएम शारंगदेव सभागृहात महागामीतर्फे आयोजित 'औरा औरंगाबाद'च्या नृत्यसंध्येत सहाव्या पुष्पात नृत्यांगणा सुजाता नायर यांनी 'मोहिनी अट्टम'ची अप्रतिम सादरीकरण करून उपस्थितांना मोहिनी घातली.

The success of season one of the dance concert series Aura Aurangabad has encouraged its organizer Mahagami, to launch the second season. The idea behind organizing the concert is to showcase the rich and diverse heritage of Aurangabad.

**TIMES CITY**

THE TIMES OF INDIA, AURANGABAD | SATURDAY, NOVEMBER 8, 2014

# Season two of Aura Aurangabad dance concert series starts off

TIMES NEWS NETWORK

**Aurangabad:** The success of season one of the dance concert series Aura Aurangabad has encouraged its organizer, MAHAGAMI, to launch the second season on Friday.

"A one-hour Indian classical dance performance named 'AURA Aurangabad', has been launched on Friday and 20 such series of dances will be staged on three consecutive evenings in a week (Friday, Saturday, Sunday) at the MAHAGAMI academy auditorium for tourists. The dances will be performed by popular artistes from across the country," said Parwati Dutta, the director of MAHAGAMI, one of the premier dance organizations in the country based in Aurangabad.

The idea behind organizing the concert of Indian classical dance is to showcase the rich and diverse heritage of Aurangabad.

The concert series has been launched in association with the Confederation of Indian Industry (CII). "The Marathwada zonal council of the CII, with an aim to contribute towards promoting tourism in the region, has decided to support MAHAGAMI in initiating the classical dance series," council chairman Prashant Deshpande said.

"The unique dance performance series will cater to the cultural quest of tourists to the city. It will bring to life a wide spectrum of masterpieces through classical dance forms like Kathak, Odissi, Bharatnatyam, Mohiniattam, Kuchipudi and several others," Dutta said.

She added, "Aurangabad region pulsates with many legends of Shiva, Dashavatar, Ramayan, Mahabharat, Buddha, Mahaveer in the form of sculptures and paintings in Ellora and Ajanta. Also, the Daulatabad (Devagiri) fort, Bibi-ka-Maqbara, Ghrushneshwar Temple, etc have had a rich history of arts and philosophy."

"The 20 series of performances which will continue till January 2015," she said. The first performance on Friday was rendered by Pandit Chitresh Das and his disciples, the most dynamic and far-reaching Kathak artistes in modern India.

Snehil Sakhare



Seema Mehta and her troupe perform Kathak at the MAHAGAMI auditorium on Friday evening

दिव्य मराठी
# दिव्य सिटी
औरंगाबाद, शनिवार, ८ नोव्हेंबर २०१४



**औराच्या शृखंलेत नृत्याची अदाकारी**
औरा, औरंगाबाद नृत्यशृंखले[illegible] पहिले नृत्य सादरीकरण महागामीच्या शारंगदेव सभागृहात शुक्रवारी झाले. अमेरिकेहून आलेल्या सीमा मेहता यांनी अदाकारी सादर केली. शनिवारी सायंकाळी ७. ३० वाजता पुणे येथील प्राजक्ता राज यांचे कथ्थक सादरीकरण होणार आहे. छाया : अरुण तळेकर

## नृत्याचे अदापूर्ण सादरीकरण, अभिनयाचे उलगडत जाणारे पैलू, पदलालित्य, हस्तमुद्रांची विलक्षण सौंदर्यपूर्ण हरकती कार्यक्रमाचे बलस्थान होते.

सकाळ
औरंगाबाद, शनिवार ८ नोव्हेंबर २०१४
८
# औरंगाबाद TODAY



औरंगाबाद : औरा-औरंगाबाद नृत्य शृंखलेत शुक्रवारी कलेचे सादरीकरण करताना अमेरिकेचे कलाकार.

# विदेशी नृत्यकलावंतांनी दाखविली नृत्याची नजाकत
## औरा-औरंगाबाद नृत्य शृंखलेस प्रारंभ

**सकाळ वृत्तसेवा**

औरंगाबाद, ता. ७ : (कै.) रोहिणी भाटे यांचे अमेरिकेतील शिष्य पंडित चित्रेस दास यांचे कथ्थक आणि सीमा मेहता यांच्या 'चंदन नृत्य भारती'च्या सादरीकरणाने शुक्रवारी (ता. सात) औरा-औरंगाबाद नृत्य शृखंलेस प्रारंभ झाला. विदेशी कलावंतांनी नृत्याची नजाकत सादर करीत रंगत भरली.

महागामी आणि भारतीय उद्योग महासंघातर्फे (सीआयआय) एमजीएम महागामी गुरुकुलमधील शारंगदेव सभागृहात शुक्रवारी सायंकाळी साडेसात वाजता कार्यक्रमास सुरवात झाली. लखनौ-जयपूर घराण्याची कथ्थक शैली असलेल्या चंदन नृत्यभारतीच्या संचालिका सीमा मेहता यांचे नृत्य अतिशय ताकदीचे असल्याची झलक त्यांच्या रंगमंच प्रवेशातच दिसून आली. अमेरिकास्थित पं. चित्रेश दास यांच्या त्या शिष्या आहेत. रंगमंच प्रवेश करताना दुर्गास्तुतीतून ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांना वंदन करण्यात आले. शुद्ध नृत्य प्रकारातून सीमा यांनी कथ्थक नृत्याचे प्रवाह दाखविले. 'भोलीभाली राधिका' या नृत्यातून राधाकृष्णाचे दैवी प्रेम दाखविण्यात आले. वृंदावनात गोपिकांसोबतची रामलीलाही नृत्यांगनेने लहेजेदार खुलविली. पारंपरिक कथ्थक नृत्य शैलीतून मालकंस तराणा सादर करताना पदलालित्य आणि हस्तमुद्रांचा सुरेख मिलाफ दाखविला. मालकंस रागाच्या साथीने तय्यारी, लयकारी, सौंदर्य आणि नजाकत अशा कथ्थक नृत्याचे चारही अंग सादर केले.

भगवान श्रीकृष्णाने करंगळीवर गोवर्धन पर्वत उचलत गोकुळवासीयांची इंद्र प्रकोपापासून संरक्षण केले ही कथा नृत्यातून अतिशय तरलतेने दाखविली. इंद्राचा गर्वहरण करणारा हा प्रसंग त्यांनी सामर्थ्यपूर्ण अभिनयातून खुलविला. नृत्याचे अदाकारीपूर्ण सादरीकरण, अभिनयाचे उलगडत जाणारे पैलू, पदलालित्य, हस्तमुद्रांची विलक्षण सौंदर्यपूर्ण हरकती त्यांचे बलस्थान होत्या. महागामीच्या पर्वती दत्ता, सीआयआयचे संचालक प्रशांत देशपांडे यांची उपस्थिती होती.

औरंगाबाद Times of India
बुधवार, १२ नोव्हेंबर २०१४ | २

चंद्रकांत थोटे



### 'साँवरा गिरीधर मोहे मन को भाये रे'

'औरा औरंगाबाद' नृत्यश्रृंखला उपक्रमात महागामीं संस्थेच्या विद्यार्थिनींनी कथ्थक नृत्याचे बहारदार सादरीकरण केले. अंगीकम, तीनताल, साँवरा या नृत्य रचना पार्वती दत्ता यांनी दिग्दर्शित केल्या आहेत. या रचनांवर विद्यार्थिंनीनी उत्तम पदन्यास करीत मुद्राभिनायातून प्राचीन कथा उलगडल्या. 'साँवरा गिरीधर मोहे मन को भाये रे' या गीतावरील नृत्य लाजवाब ठरले.





दैनिक **लोकपत्र** भूमिपुत्रांचा मित्र!
सोमवार दि. २९ डिसेंबर २०१४ ३



एमजीएममध्ये महागामीतर्फे आयोजित 'औरा औरंगाबाद' या शास्त्रीय नृत्य शंखलेत कथ्थक गुरु मनीषाताई साठे यांच्या शिष्या तेजस्वीनी साठे आणि त्यांच्या सहकारी नृत्यागणांनी कथ्थक नृत्याविष्कार सादर करुन रसिकांची मने जिंकली.

छाया: राजेश मुलकेवार

हॅलो औरंगाबाद
**लोकमत** औरंगाबाद, मंगळवार, दि. ३० डिसेंबर २०१४ २

## द ईअर ऑफ चेंज
## गुडबाय २०१४

राजकारण | अर्थकारण | मनोरंजन | क्रीडा | समाजकारण | गुन्हा | न्यूजमेकर्स

औरंगाबाद : सरते २०१४ हे वर्ष साहित्य- संस्कृतीविषयक प्रयोग व मैफलींनी गजबजलेले होते. केवळ उत्सवी मंचीय सादरीकरणच झाले नाही, तर काही एक भक्कम वैचारिक मांडणीही त्यातून हाती लागली. मत-मतांतरे, चर्चा यांच्या मंथनातून काही नवे, सकस पुढे आले, असे नक्कीच म्हणता येईल. यात नृत्य, नाट्य, व्याख्याने, अभिवाचन, पुस्तक प्रदर्शने, चित्रमैफली अशा अनेकविध बाबींचा रसिकांनी जाणकारीने आस्वाद घेतला. बाहेरगावाहून आलेल्या कलावंत व्याख्यात्यांसह स्थानिक आविष्कारांनाही तेवढीच भरभरून दाद मिळाली, हे विशेष.



### देखणी अनुभूती

१ अभिजात शास्त्रीय नृत्याच्या समृद्ध वारशाचे दर्शन घडविणारी महागामी नृत्यसंस्थेची 'औरा औरंगाबाद' ही नृत्यशृंखला लक्षवेधी ठरली. स्थानिक नृत्यप्रेमींसह विदेशी पर्यटकांनाही या आविष्काराने आकर्षित केले.

२ स्थानिक व देशभरातील नृत्यांगनांनी भरतनाट्यम्, कथक अशा नृत्यांमधील खास प्रकार सादर केले. 'उमंग' महोत्सवातून देशभरातील विशेष मुलांनी केलेला कलाविष्कार थक्क करणारा होता.

सध्या सुरु असलेला 'औरा-औरंगाबाद' हा उपक्रम औरंगाबादकरांसाठी भरतीय शास्त्रीय नृत्य संगीताचा ओघवता स्त्रोत्र बनत आहे. महागामी हे शास्त्रीय नृत्याचे केवळ पारंपारिक शिक्षण नव्हे, तर जीवन संगीत आहे, ज्याने अंतर्मनातील संवेदना सजीव होतात.

**लोकपत्र** समग्र मराठवाडा सोमवार दि. १ डिसेंबर २०१४ ३

AURA





एमजीएम महागामीच्या औरा-औरंगाबाद नृत्यमहोत्सवात ओडीसी नृत्याचे सादरीकरण करताना महागामीच्या विद्यार्थिनी.

औरंगाबाद शनिवार, दि. २० डिसेंबर २०१४

**लोकपत्र** ये मेरा एम जी एम

## नृत्य-संगीताचं वृंदगान
## महागामी



महागामी; महात्मा गांधी संगीत अकादमी हे भारतीय शास्त्रीय संगीत आणि शास्त्रीय नृत्याचे गुरुकुल आहे. एमजीएम परिसरातील निसर्गरम्यता जशी या परिसरात येणाऱ्या प्रत्येकाच्या मनाला उभारी देते. त्याचप्रमाणे महागामी हे एमजीएमच्या वातावरणातील सुरम्य शांतीस्थळ आहे. तेथील गुरू सुश्री. पार्वती दत्ता सातत्याने विविध उपक्रमंचे आयोजन करत असतात. सध्या सुरू असलेला 'औरा औरंगाबाद' हा उपक्रम औरंगाबादकरांसाठी भारतीय शास्त्रीय नृत्य संगीताचा ओघवता स्रोत बनत आहे. भारतीय शास्त्रीय संगीताचा प्रारंभच देवगिरीच्या (दौलताबाद) यादव घराण्यातील सिंहण राजाच्या काळात झाला. (इ.स.१२१० ते १२४७) शारंगदेवाने 'संगीत रत्नाकर' या संगीत शास्त्रावरील महान ग्रंथाची निर्मिती केली. हा ग्रंथ हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचा प्राण समजला जातो. संगीत रत्नाकरात शारंगदेवाने संगीताच्या सिद्धांतांचे इतके अद्वितीय, सक्षम, आणि रसात्मक वर्णन केले आहे की, आपण त्याच्या व्यापकतेची, सखोलतेची आणि चिंतनशील आस्वादकतेची कल्पनादेखील करू शकत नाही. ग्रंथात १) स्वागताध्याय, २) रागविवेकाध्याय, ३) प्रकीर्णकाध्याय, ४) प्रबंधाध्याय ५) तालाध्याय, ६) वाद्याध्याय आणि ७) नर्तनाध्याय अशी एकूण सात प्रकरणे आहेत. ही सर्व प्रकरणे त्यांच्या नावाप्रमाणेच कंठसंगीत, वाद्यसंगीत, तंतुवाद्ये, तालवाद्ये आणि नृत्यकला या कलांशी संबंधित आहेत. संगीत क्षेत्राचा हा निर्माणयात्री आपल्या मराठवाड्याचा भूमिपुत्र होता. हीच त्याची कर्मभूमी होती. त्याच्या त्या 'कर्मण्या'चा सन्मान म्हणूनच महात्मा गांधी संगीत अकादमीची मुहूर्तमेढ रोवण्यात आलेली आहे. महागामी हे शास्त्रीय संगीत आणि नृत्याचे केवळ पारंपारिक शिक्षण नव्हे, तर जीवन संगीत आहे. ज्याने अंतर्मनातील संवेदना सजीव होतात.

दैनिक **लोकपत्र** भूमिपुत्रांचा मित्र!

**संमिश्र**

शनिवार दि. ८ नोव्हेंबर २०१४ | १२

# महागामी-सीआयआयच्या नृत्य महोत्सवास शानदार प्रारंभ



छंदम नृत्यभारती इंडियाच्या संचालिका सीमा मेहता आणि त्यांच्या शिष्यांनी कथ्थक नृत्य प्रकारातील राधाकृष्ण संवाद व मालकंस तराणा हे आविष्कार सादर करून रसिकांची मने जिंकली.
(छाया - राजेश मुलकेवार)

## सीमा मेहता यांनी सादर केले कथ्थकातील विविध नृत्याविष्कार

औरंगाबाद / प्रतिनिधी

एमजीएम मधील महागामीच्या गुरुकुलमध्ये शुक्रवारपासून 'औरा-औरंगाबाद' या शास्त्रीय नृत्य महोत्सवास शानदार सुरुवात झाली. छंदम् नृत्य भारती इंडियाच्या संचालिका सीमा मेहता आणि त्यांच्या शिष्यांनी कथ्थक नृत्यातील विविध आविष्कार सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

एमजीएम संचलित महागामीच्या वतीने ७ नोव्हेंबर २०१४ ते जानेवारी २०१५ असे तीन महिने (शुक्रवार-शनिवार आणि रविवार) हा महोत्सव होणार असून, पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी भारतीय कलांच्या वैभवाचे दर्शन शास्त्रीय नृत्यप्रकारातून घडविण्यात येणार आहे. शुक्रवारी सायंकाळी ७.३० वाजता सीआयआयचे चेअरमन प्रशांत देशपांडे व्हा. चेअरमन श्रीराम नारायणन्, ऋषी बागला आणि महागामीच्या संचालिका पार्वती दत्ता यांच्या प्रमुख उपस्थितीत या नृत्य महोत्सवाचे उद्घाटन झाले.

छंदम नृत्य भारतीच्या संचालिका सीमा मेहता यांनी नृत्य कलेचा आविष्कार सादर करण्यापूर्वी रंगमंचाचे महत्त्व, दुर्गास्तुती कथन करून सुरुवातीस कथ्थक योगाचे सादरीकरण केले. यानंतर मेहता यांनी राधाकृष्ण यांच्यातील भावविभोर नृत्याविष्कार आणि मालकंस तराणा हे प्रकार सादर करून उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. तीन महिने प्रत्येक आठवड्याच्या शुक्रवार, शनिवार आणि रविवार असे तीन दिवस रात्री ७.३० ते ८.३० च्या दरम्यान कथ्थक, ओडीसी, भरतनाट्यम्, कुचीपुडी, मोहिनअट्टम असा विभिन्न आविष्कार रसिकांना पहायला मिळणार आहेत.

## राज्यातील शाळांची तपासणी

औरंगाबाद / प्रतिनिधी

राज्यातील माध्यमिक व काही प्राथमिक शाळा आजपासून सुरू झाल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर पहिल्याच दिवशी शाळांना भेटी देऊन त्यांची तपासणी करण्याचे आदेश प्राथमिकच्या शिक्षण सहसंचालकांनी दिले आहेत. आज (शुक्रवारी) मराठवाड्यातील काही शाळांची तपासणी झाली तर काहींची तपासणी ही येत्या सोमवारपासून केली जाणार आहे . सोमवारी होणाऱ्या शाळांच्या भेटीमध्ये विद्यार्थ्यांच्या उपस्थितीकडे तपासणीस आलेल्या अधिकाऱ्यांचे विशेष लक्ष असणार आहे.

राज्यातील सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक ते केंद्रप्रमुख यांनी किमान तीन शाळांना भेटी देऊन केलेल्या कामाचा अहवाल शिक्षणाधिकाऱ्यांकडे सादर करणे आवश्यक आहे. शाळेला भेट दिल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी कार्यरत शिक्षकांची संख्या, विद्यार्थ्यांची इयत्तानिहाय पट, उपस्थिती व अनुपस्थिती, दैनिक टाचण काढलेल्या शिक्षकांची संख्या, प्रत्यक्ष वर्गात अध्यापन करत असलेल्या शिक्षकांची संख्या, माध्यान्ह भोजन योजना, शिल्लक असलेला तांदूळ, धान्यादी माल पुरेसा आहे का? शाळेतील स्वच्छतागृह वापरात असून, स्वच्छ आहे का? स्वच्छतागृहाशेजारी साबण व विद्यार्थ्यांना हात धुण्यासाठी व्यवस्था आहे का? शालेय परिसर स्वच्छ आहे का? याची पाहणी करून त्याचा अहवाल तयार करायचा आहे. तो अहवाल शिक्षणाधिकाऱ्यांकडे द्यायचा आहे. प्राथमिक शिक्षण सहसंचालक, पुणे यांनी उद्यापासून (शुक्रवार) शाळा सुरू होणार असल्याबाबतचे पत्र काढले आहे.

महागामीच्या वतीने 'औरा-औरंगाबाद' हा महोत्सव तीन महीने होणार असून, पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी भरतीय कलांच्या वैभवाचे दर्शन शास्त्रीय नृत्य प्रकारातून घडविण्यात येणार आहे.

दैनिक **लोकपत्र** भूमिपुत्रांचा मित्र!

मंगळवार दि. २३ डिसेंबर २०१४ | ३



एमजीएममध्ये महागामी आयोजित औरा औरंगाबाद या शास्त्रीय नृत्य मालिकेत रविवारी सई शेट्ये, नेहा मुजूमदार यांनी शास्त्रीय नृत्य आविष्कार सादर करून रसिकांची मने जिंकली. छाया: राजेश मुलकेवार

**औरंगाबाद Times** of India

बुधवार, ३ डिसेंबर २०१४ | २



औरा-औरंगाबाद या महागामीच्या नृत्यश्रृंखलेमध्ये ओडिसी नृत्यातील लयबद्ध पदलालित्य अन् मुद्राभिनयाने मुंबईच्या कलाकारांनी औरंगाबादकरांची मने जिंकली. या सर्व कलाकार मुंबई येथील कौशिकी नृत्यभाषा अकादमीच्या दक्षा मशरूवाला यांच्या शिष्य आहेत.

महाराष्ट्र टाइम्स, औरंगाबाद ■ शनिवार, ८ नोव्हेंबर २०१४
www.facebook.com/abdmata
mtabd@indiatimes.com



# कथ्थकच्या लयकारीने पर्यटक भारावले



'औरा औरंगाबाद' उपक्रमात सीमा मेहता यांच्या शिष्यांनी बहारदार कथ्थक सादरीकरण केले.

**म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद**

पर्यटनाला चालना देणारा 'औरा औरंगाबाद' नृत्यश्रृंखलेचा पहिला कार्यक्रम सीमा मेहता यांच्या विलोभनीय कथ्थक नृत्याने गाजला. कथ्थक लयकारी, खूबसुरती व नजाकत पर्यटक रसिकांसाठी अलौकिक भेट ठरली. महागामी संस्थेच्या सभागृहात शुक्रवारी सायंकाळी हा कार्यक्रम रंगला.

पर्यटनवृद्धीसाठी विदेशी पर्यटकांना प्राचीन वारसा आणि संस्कृतीचे दर्शन घडवणारा 'औरा औरंगाबाद' उपक्रम शुक्रवारी उत्साहात सुरू झाला. छंदम नृत्यभारती संस्थेच्या संचालिका सीमा मेहता आणि शिष्यांनी पहिल्या दिवशी कथ्थक सादर केले. कलाकार आणि रंगमंचासाठी आशीर्वाद मागणारा 'रंगमंच' प्रकाराने कार्यक्रमाला सुरूवात झाली. 'दुर्गा स्तुती' आणि ब्रह्मा, विष्णू आणि महेश या देवतांची आराधना नृत्यातून दाखवली. पंडित चित्रेश दास यांची निर्मिती असलेला 'कथ्थक योगा' प्रकारही वैशिष्ट्यपूर्ण ठरला. उणे तापमानात तपश्चर्या करणाऱ्या साधूंपासून प्रेरणा घेऊन हा प्रकार तयार झाला. वेगळा ठेका, वेगळी रचना आणि वेगळे नृत्य असे या नृत्याचे वेगळेपण आहे. सीमा मेहता यांनी योगात नृत्याची वैशिष्ट्ये खुबीने सादर केली. 'भोलीभाली राधिका' या नृत्य प्रकारात कृष्ण आणि राधेचे लडीवाळ प्रेम दाखवले. पदन्यास आणि गिरकीचे वैशिष्ट्य हुबेहुब दाखवत गोपिकांचे वृंदावनातील विश्व नृत्यातून उभारण्यात आले.

'औरा औरंगाबाद' नृत्य उपक्रमाला सुरुवात; कथ्थक सादरीकरण रंगले

'मालकंस तराणा'ने कार्यक्रमाची सांगता झाली. तयारी, लयकारी यांचे विहंगम दर्शन कलाकारांनी घडवले. सीमा मेहता यांना अमेरिकेतील शिष्यांनी साथसंगत केली. या कार्यक्रमाला 'सीआयआय'चे अध्यक्ष प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष एन. श्रीराम, उद्योजग ऋषी बागला, 'महागामी'च्या संचालिका पार्वती दत्ता यांची उपस्थिती होती.

### रंगमंचीय उणीव

मागील वर्षी 'औरा औरंगाबाद' उपक्रम 'महागामीती'ल रंगमंचावर सादर झाला. यावर्षी बैठ्या हॉलमध्ये कार्यक्रम असल्यामुळे रंगमंचीय उणीव भासत आहे. मोजक्याच रसिकांसाठी वातानुकूलित हॉलमध्ये हा उपक्रम आहे; मात्र नृत्याचे अस्सल दर्शन घडवण्यासाठी रंगमंचीय सादरीकरणाची गरज असल्याची रसिकांनी सांगितले.

लोकमत
हॅलो औरंगाबाद
औरंगाबाद, सोमवार, दि. ८ डिसेंबर २०१४

फिरोज खान



नृत्याविष्कार... महागामीत चेन्नईच्या दीपा कर्ता आणि सरिता के या नृत्यांगनांनी भरतनाट्यम्‌चा आविष्कार सादर केला.

पर्यटनाला चालना देणारा 'औरा-औरंगाबाद' नृत्यश्रृंखलेचा पहिला दिवस सीमा मेहता यांच्या विलोभनीय कथ्थक नृत्याने गाजला. कथ्थकची लयकारी व नजाकत पर्यटकांसाठी अलौकिक भेट ठरली.

हॅलो औरंगाबाद | शहर विशेष | लोकमत औरंगाबाद, शनिवार, दि. ८ नोव्हेंबर २०१४ | ५



फिरोज खान

कलाविष्कार... 'औरा औरंगाबाद' नृत्यमहोत्सवात कलाविष्कार करताना कथकनर्तिका.

महागामी नृत्यसंध्या : 'औरा औरंगाबाद'चे प्रथमपुष्प

# देखण्या अदाकारीने भारावला माहोल!

औरंगाबाद : यमुनातीरी घागर घेऊन जाणारी कृष्णप्रिया राधा, तिचे मडके फोडत लपून बसणारा अवखळ कान्हा आणि दोघांच्या मूकसंवादातून युगानुयुगे साकारणारी एक सावळी प्रेमकहाणी... 'भोलीभाली राधिका नटखट कन्हैया...' या रचनेवर नृत्यांगनांनी कथकचा आविष्कार केला.

भारतीय संस्कृतीचा भव्य वारसा पाहण्यास येणाऱ्या विदेशी पर्यटकांसाठी खास आयोजित 'औरा औरंगाबाद' या नृत्यशृंखलेच्या उद्घाटनदिनी ही मैफल रंगली. महागामी व सीआयआय यांच्या संयुक्त कल्पनेतून एकूण तीस मैफली सादर केल्या जाणार आहेत.

महागामीच्या संचालिका पार्वती दत्ता, सीआयआयचे प्रशांत देशपांडे व रसिक यावेळी उपस्थित होते.

नजाकतदार पदन्यासासह मुद्रेवरील बोलक्या भावांमधून सीमा मेहता, रैना गगरात व सोनल मयानी यांनी रसिकांची दाद मिळविली. मुंबईहून आलेल्या या पं. चित्रेश दास यांच्या या शिष्यांनी शहरात केलेला हा पहिलाच आविष्कार होता.

सुरुवातीला त्यांनी 'रंगमंच' प्रकारातून अनादि अनंत ब्रह्मा, विष्णू, महेश यांच्या विराट रुपाचे दर्शन घडविले.

वेगवान गिरक्या आणि पदन्यासाचा समावेश असलेल्या मालकंस तराण्यातील तयारी, लयकारी, सौंदर्य आणि नजाकत या चार पैलूंनी रसिक मुग्ध झाले.

घुंगरांचा मधुर आवाज व नेत्रपल्लवीतून केलेला संवाद कथकच्या जिवंतपणाचा प्रत्यय देणारा ठरला. यासह अभिनव 'कथक योगा'मधून सीमा मेहता यांनी हिमालयात शेकडो वर्षे तपसाधना केलेले साधू आणि योगी यांना आदरांजली वाहिली.

शरीर, मन आणि आत्म्याच्या एकरुपतेची साक्ष देणारा हा नृत्य प्रकार होता. उद्या सायंकाळी ७.३० वा. महागामी सभागृहतच अजून एक नृत्यमैफल अनुभवता येणार असल्याचे सूत्रसंचालिका सुकन्या वालसकर म्हणाल्या.

सकाळ | औरंगाबाद, शुक्रवार ७ नोव्हेंबर २०१४ | ६ | औरंगाबाद TODAY

# औरा-औरंगाबाद नृत्यशृंखलेची आजपासून सुरवात

## महागामी-सीआयआयचा अनोखा उपक्रम

**औरंगाबाद, ता. ६ :** जगाचे लक्ष वेधणाऱ्या शिल्पकला, चित्रकलांची दैवी भेट लाभलेल्या औरंगाबादेत पर्यटकांची मोठी वर्दळ असते. या पर्यटकांना अभिजात भारतीय कलांच्या वैभवाचे दर्शन घडविण्यासाठी भारतीय उद्योग महासंघ (सीआयआय) आणि महागामीतर्फे शुक्रवारपासून (ता. सात ते जानेवारी २०१५) आठवड्यातून तीन दिवस 'औरा-औरंगाबाद' या नृत्यशृंखला घेण्यात येणार आहे.

सुरवात शुक्रवारी (कै.) रोहिणी भाटे यांचे अमेरिकन शिष्य पंडित चित्रेश दास यांच्या कथ्थक नृत्याने होईल, अशी माहिती महागामीच्या संचालिका पर्वती दत्ता, सीआयआयचे संचालक प्रशांत देशपांडे यांनी पत्रकार परिषदेत गुरुवारी (ता. सहा) दिली. ते म्हणाले, ''एमजीएमच्या महागामी गुरुकुल येथे सायंकाळी साडेसात ते साडेआठ दरम्यान जानेवारीपर्यंत प्रत्येक शुक्रवारी, शनिवारी आणि रविवारी भारतीय पारंपरिक नृत्यांची पर्वणी पर्यटकांसाठी उपलब्ध केली आहे. मागील वर्षी 'औरा-औरंगाबाद' शृंखलेंतर्गत १८ नृत्य कार्यक्रम झाले. पुढील पाच वर्षे हा उपक्रम सातत्याने राबविणार आहोत.'' उपसंचालक आणि इंडेस हाऊझरचे श्रीराम नारायण म्हणाले, ''भारतीय शिल्पकला, चित्रकला आणि अभिजात कलांनी जगभराला भुरळ घातली आहे. यानिमित्ताने पर्यटक आपल्याकडे येतात, त्यायोगे त्यांनी उद्योगातही गुंतवणूक करावी, असा आमचा मानस आहे. पर्यटकांनी जास्तीत जास्त वेळ आपल्या शहरात घालवावा म्हणून हा कार्यक्रम विशेष महत्त्वाचा आहे. दिवसभर पर्यटनानंतर रात्री नृत्योत्सवाची अनुभूती पर्यटकांसाठी पर्वणी ठरेल.''

श्रीमती दत्ता म्हणाल्या, ''औरंगाबादने शिल्प-चित्रांतून जगाचे लक्ष वेधले. या कार्यक्रमात येणारा प्रत्येक संघ त्यावर आधारित नृत्य सादर करणार आहे. प्रत्येक कार्यक्रमाला हजेरी लावून शहरवासीयांनी याचा आस्वाद घ्यावा.'' सीआयआयचे समन्वयक अमोल मोहिते, एमजीएम वृत्तपत्र विद्या विभागाच्या प्राचार्या डॉ. रेखा शेळके यांची उपस्थिती होती.

भारतीय शिल्पकला, चित्रकला आणि अभिजात कलांनी जगभराला भुरळ घातली आहे. यानिमित्ताने पर्यटक आपल्याकडे येतात. पर्यटकांनी जास्तीत जास्त वेळ आपल्या शहरात घलवावा म्होणून हा कार्यक्रम विशेष महत्त्वाचा आहे. दिवसभर पर्यटनानंतर रात्री नृत्योत्सवाची अनुभूती पर्यटकांसाठी पर्वणी ठरली.

दैनिक लोकपत्र | संमिश्र | सोमवार दि. १७ नोव्हेंबर २०१४ | ३

## मोहिनी अट्टम



एमजीएमच्या महागामीद्वारा आयोजित गुरुकुलमध्ये 'औरा औरंगाबाद' महोत्सवात मोहिनी अट्टम हे शास्त्रीय नृत्य सादर करताना मुंबई येथील उपासना अकॅडमीच्या सुजाता नायर व सहकारी.

महाराष्ट्र टाइम्स, औरंगाबाद ■ शुक्रवार, ७ नोव्हेंबर २०१४ औरंगाबाद ५

# विदेशी पर्यटकांसाठी 'औरा औरंगाबाद'

## पर्यटनवाढीसाठी दर आठवड्याला रंगणार नृत्यशृंखला; मान्यवरांचा सहभाग

**म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद**

राज्याची पर्यटन राजधानी असलेल्या औरंगाबाद शहरात पर्यटकांना भारतीय संस्कृती व प्राचीन वारशाचे दर्शन घडवण्यासाठी 'औरा औरंगाबाद' नृत्यश्रृंखला उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. पर्यटनस्थळांना प्रकाशात आणतानाच पर्यटन भरभराटीसाठी या उपक्रमातून प्रयत्न केले जाणार आहेत, अशी माहिती महागामी संस्थेच्या संचालिका पार्वती दत्ता यांनी दिली. सीआयआय आणि महागामी यांच्या 'औरा औरंगाबाद' उपक्रमाची माहिती देण्यासाठी गुरुवारी (६ नोव्हेंबर) आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

दरवर्षी अजिंठा-वेरूळ लेणी पाहण्यासाठी जगभरातील लाखो पर्यटक औरंगाबाद शहरात येतात. या पर्यटकांना सायंकाळी विरंगुळ्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम नसल्याचे लक्षात आल्यानंतर महागामी संस्था आणि सीआयआय यांनी 'औरा औरंगाबाद' नृत्यशृंखला उपक्रम हाती घेतला आहे. सतत पाच वर्षे उपक्रम राबवून, विदेशी पर्यटकांना भारतीय संस्कृती आणि नृत्याची माहिती दिली जाणार आहे. या माध्यमातून प्राचीन पर्यटनस्थळांचा वारसा टिकवणे आणि संस्कृतीची महती सांगण्याचा प्रयत्न आहे. मागील वर्षी प्रत्येक आठवड्यात महागामी संस्थेत सायंकाळी हा कार्यक्रम झाला. एकूण २० कार्यक्रमात कथ्थक, ओडिसी, भरतनाट्यम, मोहिनीअट्टम आणि कुचिपुडी या शास्त्रीय नृत्यांचे सादरीकरण झाले. या उपक्रमाला समाधानकारक प्रतिसाद मिळाला. यावर्षी नोव्हेंबर ते जानेवारी महिन्याच्या प्रत्येक शुक्रवार, शनिवार व रविवारी 'औरा औरंगाबाद' उपक्रम होणार आहे.

एकूण ३० कार्यक्रमांच्या माध्यमातून नावाजलेले कलाकार सादरीकरण करणार आहेत असे पार्वती दत्ता यांनी सांगितले. या उपक्रमाला सात नोव्हेंबरपासून सुरुवात होईल. पं. चित्रेश दास शिष्यांसह सादरीकरण करणार आहेत. 'महागामी'च्या आवारात सायंकाळी सात वाजता हा कार्यक्रम होईल. पत्रकार परिषदेला 'सीआयआय'चे उपाध्यक्ष श्रीराम नारायण, समन्वयक अमोल मोहिते व डॉ. रेखा शेळके यांची उपस्थिती होती.



पर्यटकांसाठी 'औरा औरंगाबाद' या सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे.

### सोशल मीडियातून प्रसार

'शहर विकासासाठी हा उपक्रम आहे. विदेशी पर्यटकांना उपक्रमाबाबत माहिती देण्यासाठी रेल्वेस्थानक, विमानतळ आणि मोठ्या हॉटेल्समध्ये माहितीपुस्तिका उपलब्ध केली जाणार आहे. या उपक्रमाचा प्रसार फेसबुक, ट्विटर, व्हॉटसअॅप या सोशल मीडियाद्वारे होणार आहे. तसेच महागामीच्या वेबसाइटवर माहिती उपलब्ध आहे. लवकरच या उपक्रमाची स्वतंत्र वेबसाइट सुरू केली जाणार आहे,' असे 'सीआयआय'चे अध्यक्ष प्रशांत देशपांडे यांनी सांगितले.

दरवर्षी अजिंठा-वेरुळ लेणी पाहण्यासाठी जगभरातील लाखो पर्यटक औरंगाबाद शहरात येतात. या पर्यटकांना सायंकाळी विरंगुळासाठी संस्कृतिक कार्यक्रम नसल्याचे लक्षात आल्यानंतर महागामी संस्था यांनी 'औरा-औरंगाबाद' नृत्यशृंखला उपक्रम हाती घेतले.

दैनिक लोकपत्र भूमिपुत्रांचा मित्र! मंगळवार दि. ३० डिसेंबर २०१४ ३



एमजीएमधील महागामीतर्फे आयोजित 'औरा औरंगाबाद' या शास्त्रीय नृत्यमालिकेत रविवारी अभा औटी आणि सहकारी नृत्यांगणांनी मनोवेधक कथ्थक नृत्याविष्कार सादर केला. (छाया : राजेश मुलकेवार)

दैनिक लोकपत्र भूमिपुत्रांचा मित्र! समग्र मराठवाडा रविवार दि. ११ जानेवारी २०१५ ३

### औरा औरंगाबाद



सीआयआय व महागामी यांच्या संयुक्त विद्यमाने एमजीएममध्ये आयोजित 'औरा औरंगाबाद' नृत्यश्रृंखलेच्या २८ व्या पर्वात आनंद सतचितानंद आणि जयलक्ष्मी जयराम यांनी शुक्रवारी भरतनाट्यमचा विलोभनीय आविष्कार सादर करुन रसिकांना मंत्रमुग्ध केले.

# तालबद्ध पदन्यासाची रसिकांवर मोहिनी

## 'औरा औरंगाबाद' उपक्रमात प्राजक्ता राज यांचे कथ्थक रंगले

**म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद**

प्राचीन श्लोक आणि रचनांवर आधारीत भावपूर्ण नृत्य अदाकारीने प्राजक्ता राज यांनी रसिकांची दाद मिळवली. 'औरा औरंगाबाद' उपक्रमात शनिवारी (८ नोव्हेंबर) सायंकाळी महागामी संस्थेत प्राजक्ता यांचे नृत्य सादरीकरण झाले. 'त्रिदेवता स्तुती', 'युगल कीर्तन', 'तीनताल' हे पारंपरिक प्रकार तालबद्ध पदन्यासाने रसिकांसाठी विशेष सांस्कृतिक पर्वणी ठरली.

पुणे येथील 'आरोहिणी आर्ट वेल्फेअर ऑर्गनायझेशन'च्या प्राजक्ता राज यांचे कथ्थक सादरीकरण 'औरा औरंगाबाद' उपक्रमात लक्षणीय ठरले. गुरू डॉ. रोहिणी भाटे आणि रोशन दाते यांच्या शिष्या असलेल्या प्राजक्ता यांनी नृत्य रचना तन्मयतेने रंगवली. 'त्रिदेवता स्तुती'ने सादरीकरण सुरू केले. शिव, दुर्गा आणि कृष्णाची आराधना पारंपरिक श्लोकांच्या माध्यमातून केली. कथ्थकच्या पारंपरिक 'तीनताल' प्रकाराला रसिकांची भरभरून दाद मिळाली. तालबद्ध पदन्यास आणि गिरक्यांनी वातावरण नादमय केले. रामजन्मावर संत तुलसीदास रचित 'चैती' रचनाही प्राजक्ता यांनी बहारदार नृत्यातून उलगडली. रामजन्मामुळे सृष्टीवर निर्माण झालेले चैतन्य आणि आनंद नृत्यातून प्रतिबिंबित केला. श्रीकृष्णाची आराधना करणारे 'युगल कीर्तन'ही प्रेक्षणीय ठरले. रोहिणी भाटे, पं. लच्छू महाराज यांनी दिग्दर्शित केलेल्या नृत्य रचनांची रसिकांना पर्वणी मिळाली. 'राग हंसध्वनी' आणि झपतालातील 'तराणा' कथ्थकचे वेगळेपण दाखवणारा होता. शास्त्रीय नृत्यात सर्वसामान्यांशी जवळीक साधणारे कथ्थक नृत्य विशेष लोकप्रिय आहे. या कार्यक्रमातही त्याची प्रचिती आली. 'होली', 'गौरी रमणा' या प्रकारांना चांगली दाद मिळाली. 'समूह कीर्तना'ने सांगता झाली. या अप्रतिम सादरीकरणानंतर 'महागामी'च्या संचालिका पार्वती दत्ता यांनी प्राजक्ता राज आणि शिष्यांचा सत्कार केला. यावेळी पर्यटक व रसिक उपस्थित होते.



'औरा औरंगाबाद' उपक्रमात प्राजक्ता राज कथ्थक नृत्य सादर करताना.

### कथामय नृत्याविष्कार

कथ्थक म्हणजे कथा सांगणे. अभिनय आणि गायनाच्या माध्यमातून एखादी कथा सांगणारा हा नृत्याविष्कार उत्तर भारतात विशेष लोकप्रिय ठरला. पं. बिरजू महाराज यांनी कथ्थकला विशेष दर्जा मिळवून दिला. कथ्थक अनुभवणे रसिकांसाठी आनंददायी संधी असते.



**मल्हारी**



एमजीएममध्ये महागामीतर्फे आयोजित 'औरा–औरंगाबाद' या शास्त्रीय नृत्य शृंखलेत शनिवारी रात्री प्रिया जोशी आणि त्यांच्या सहकारी शिष्यांनी भरतनाट्यमचा अप्रतिम आविष्कार सादर केला. यात 'मल्हारी' हे नृत्य विशेष अदाकारींसह सादर करून त्यांनी उपस्थितांची दाद मिळवली. (छाया – राजेश मुलकेवार)

प्राचीन श्लोक आणि रचनांवर आधारीत भवपूर्ण नृत्य अदाकारीने प्राजक्ता राज यांनी रसिकांची दाद मिळवली. तालबद्ध पदन्यास आणि गिरक्यांनी वातावरण नादमय केले.

दिव्य मराठी
दिव्य सिटी
औरंगाबाद, सोमवार, १७ नोव्हेंबर २०१४

# मोहिनीअट्टमचे मनोहारी विश्व

## उपासना ग्रुपच्या सुजाता नायर यांच्या कलात्मक कृतींचे सृजनात्मक सादरीकरण

प्रतिनिधी | औरंगाबाद

कथ्थक, भरतनाट्यमनंतर पर्यटक आणि कलाविश्वाला मोहिनी घालण्यासांठी औरा-औरंगाबाद नृत्यश्रृंखलेत रविवारी मोहिनीअट्टमचे मनोहारी पदन्यास सादर करण्यात आले. महागामीच्या शारंगदेव सभागृहात आयोजित या कलाकृतीला डोळ्यांत साठवण्यासाठी दर्दी रसिक उपस्थित होते. पारंपरिक आणि सृजनात्मक प्रस्तुती करत या वेळी मुंबईच्या उपासना ग्रुपने सुजाता नायर यांच्या नेतृत्वात विलक्षण कलाकृतींचे सादरीकरण केले.

राग हमीर कल्याणी आणि आदितालात निबद्ध 'वर्णम वर्णम' रचनेने सुजाता यांनी आजच्या प्रस्तुतीची सुरुवात केली. बाणासुराची मुलगी उषा हिची कथा यामध्ये दाखवण्यात आली. उषाच्या स्वप्नात श्रीकृष्णाचा नातू अनिरुद्ध येतो. चित्रलेखा ही तिची जिवलग सखी. उषाच्या स्वप्नात आलेला कृष्णकांतीचा आणि कमलनयनांचा राजकुमार तिला अस्वस्थ करून जातो. सखी चित्रलेखा त्याला तिन्ही लोकांत जिथे कुठे असेल तिथून शोधून आणण्याचे वचन देते. हा प्रसंग मोहिनीअट्टमच्या विलक्षण अदाकारीतून नृत्यांगनांनी खुलवला.

अकराव्या शतकातील महान कवी जयदेव यांच्या लेखणीतून साकारलेल्या गीतगोविंदम या ग्रंथातील पहिली अष्टपदी सादर करण्यात आली. भगवान विष्णूच्या दशावतार रूपाचे दर्शन या प्रस्तुतीतून घडवण्यात आले. यामध्ये बुद्धरूपाचेही दर्शन घडवण्यात आले. धनश्री रागातील तिल्लानाने शुद्ध नर्तन आविष्कार दाखवत सांगता झाली. तिरुवनंतपुरम येथील महाराजा स्वाती तिरुनल यांनी रचलेली ही प्रस्तुती पद्मनाभ मंदिराच्या गर्भगृहात देवासमोर समर्पित भावाने केली जात होती. या वेळी पार्वती दत्ता यांची उपस्थिती होती.

### पुढील प्रस्तुती शुक्रवारी

महागामी आणि सीआयआयच्या वतीने आयोजित औरा-औरंगाबाद नृत्यश्रृंखलेचे तिसरे पर्व येत्या शुक्रवारी २१ नोव्हेंबर ते २३ नोव्हेंबरदरम्यान गुंफले जाईल. महागामीच्या शारंगदेव सभागृहात सायंकाळी ७.३० ते ८.३० वाजेदरम्यान सादरीकरणे होतील. मोफत आणि सर्वांसाठी खुला असलेल्या या कार्यक्रमात रसिकांनी हजेरी लावत आस्वाद घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



**अष्टपदी** औरा-औरंगाबाद नृत्यश्रृंखलेत मुंबईच्या उपासना ग्रुपने सुजाता नायर यांच्या नेतृत्वात महान कवी जयदेव यांच्या लेखणीतून अवतरलेल्या 'गीतगोविंदम' या ग्रंथातील पहिली अष्टपदी सादर केली. बातमी पान. ६ छाया : अरुण तळेकर

सोमवार, २४ नोव्हेंबर २०१४
पुण्य नगरी
औरंगाबाद वृत्तवेध

भरतनाट्यम



एमजीएम येथील शारंदेव सभागृहात सुरू असलेल्या 'औरा औरंगाबाद' नाट्यशृखंलेत रविवारी मंदिरा जोशी, सुरभी पारकर, नवनीत पाटील, नटराज कटकुराम यांनी भरतनाट्यम सादर करीत प्रेक्षकांची दाद मिळवली.

कथ्थक , भरतनाट्यमनंतर पर्यटक आणि कलाविश्वाला मोहिनी घलण्यासाठी औरा-औरंगाबाद नृत्यश्रृंखलेत रविवारी मोहिनीअट्टमचे मनोहारी पदन्यास सादर करण्यात आले. या कलाकृतीला डोळ्यांत साठवण्यासाठी दर्दी रसिक उपस्थित होते.

दैनिक लोकपत्र भूमिपुत्रांचा मित्र!
सोमवार दि. ८ डिसेंबर २०१४ ३



एमजीएममध्ये महागामीतर्फे आयोजित 'औरा–औरंगाबाद' या शास्त्रीय नृत्यशृंखलेत उषा मेनन यांच्या शिष्या दीपा करथा यांनी भरतनाट्यम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. (छाया – राजेश मुलकेवार)

दैनिक लोकपत्र भूमिपुत्रांचा मित्र!

मंगळवार दि. ९ डिसेंबर २०१४ ३



एमजीएममध्ये महागामीतर्फे आयोजित **'औरा औरंगाबाद'** या शास्त्रीय नृत्य मालिकेत चेन्नईच्या दीपा कर्था व सरिता के. या नृत्यांगणांनी भरतनाट्यमचा आविष्कार सादर करून उपस्थितांची मने जिंकली. (छाया – राजेश मुलकेवार)

दैनिक लोकपत्र भूमिपुत्रांचा मित्र! समग्र मराठवाडा

मंगळवार दि. ६ जानेवारी २०१५ ३



**एमजीएममध्ये महागामीतर्फे आयोजित 'औरा औरंगाबाद' या शास्त्रीय नृत्य शृंखलेत रविवारी प्रसिद्ध ओडिसी नृत्यांगणा शुभदा वराडकर यांनी ओडिसी नृत्याविष्कार सादर करून रसिकांची मने जिंकली.**

**(छाया : राजेश मुलकेवार)**

सूर, ताल आणि पारंपरिक वेशभूषेत भारतीय नृत्य कौशल्यातून विदेशी पर्यटकांना देखील पारंपरिक नृत्य कौशल्याने मोहिनी घालणारी कला सादर करण्यात आली. महागामी गुरुकुल येथील शारंगदेव सभागृहात आयोजित कार्यक्रमात एकाहून एक सुंदर कलाकृती अनुभवास आली.

दैनिक लोकपत्र भूमिपुत्रांचा मित्र!

मंगळवार दि. १६ डिसेंबर २०१४ ३

नृत्याविष्कार



रविवारी रात्री एमजीएमच्या महागामीतर्फे आयोजित 'औरा–औरंगाबाद' शास्त्रीय नृत्य शृंखलेत प्रिया जोशी, अंबरी रेगे यांनी भरतनाट्यममधील विविध नृत्य आविष्कार सादर करून उपस्थितांची मने जिंकली. (छाया – राजेश मुलकेवार)

पुण्यनगरी औरंगाबाद वृत्तवेध

रविवार, ९ नोव्हेंबर २०१४ ३

# 'दक्ष यज्ञा'च्या नृत्याची रसिकांना मोहिनी

## 'औरा औरंगाबाद'च्या द्वितीय पुष्पात अप्रतिम नृत्याविष्कार



औरंगाबाद/प्रतिनिधी

सूर, ताल आणि पारंपरिक वेशभूषेत भारतीय नृत्य कौशल्यातून विदेशी पर्यटकांनादेखील पारंपरिक नृत्य कौशल्याने मोहनी घालणारी कला सादर करण्यात आली. महागामी गुरुकुल येथील शारंगदेव सभागृहात आयोजित कार्यक्रमात एकाहून एक सुंदर कलाकृती अनुभवास आली. 'औरा औरंगाबाद'च्या द्वितीय पुष्पात स्व. गुरू डॉ. रोहिणी बाटे आणि गुरू रोशन दाते यांच्या शिष्या नृत्यांगना प्राजक्ता राज व त्यांच्या सहकाऱ्यांनी 'त्रिदेव स्तुती' सादर करून शिव, दुर्गा आणि कृष्णा यांच्या अद्‌भुत नृत्याविष्कार सादर केले. स्व. गुरू डॉ. रोहिणी बाटे यांनी कोरिओग्राफ केलेले होते.

त्यानंतर तीनताल या पारंपरिक नृत्यातील अदाकारी आणि सूक्ष्मातीसूक्ष्म नजाकत आणि हावभाव सादर करून उपस्थितांकडून टाळ्यांनी प्रतिसाद मिळाला. यानंतर 'दक्ष यज्ञ' या तिसऱ्या प्रस्तुतीमध्ये सतीचे व दक्ष आणि शिव यांच्यावर आधारित चित्रण मांडले. एकीकडे दक्षनगरीतील यज्ञाची तयारीची तेथील वातावरणाचे शब्दबद्ध वर्णन तर दुसरीकडे कैलास पर्वतावरील सती आणि शिव यांच्यातील संवादाचे हिंदीतून अप्रतिम असे नृत्य सादर करण्यात आले. 'छटी'यात तुलसीदास लिखित भगवान राम यांच्या जन्माच्या ९व्या दिवशी लिखित 'छटी'चे नृत्याविष्कार सादर करून नृत्यांगना प्राजक्ता राज यांनी सर्वांचे लक्ष वेधले. यानंतर 'गौरी रमणा', युगल कीर्तन, तराणा, होरी, समूह कीर्तन आदींच्या माध्यमातून 'औरा औरंगाबाद'ची संध्या अविस्मरणीय केली.

सकाळ
औरंगाबाद, बुधवार
३१ डिसेंबर २०१४
८ औरंगाबाद

## शारंगदेव महोत्सवातून विविध नृत्यांची गुंफण

एमजीएमच्या महागामी गुरुकुल अकादमीतर्फे देशातील विविध शास्त्रीय, उपशास्त्रीय नृत्यांचे सादरीकरण शारंगदेव महोत्सवातून होते. दरवर्षी जानेवारी महिन्यात हा महोत्सवात घेण्यात येतो. यंदा महागामी गुरुकुल अकादमीतर्फे शास्त्रीय नृत्याचा जगात प्रसार-प्रचार या उद्देशाने औरा-औरंगाबाद हा कार्यक्रम घेण्यात येत आहे.

प्रख्यात नृत्यांगना गुरु रोहिणी भाटे यांच्या शिष्या प्राजक्ता राज यांच्या चपळाईपूर्ण अदाकारीने नटलेल्या नृत्य सादरीकरणाने रसिकांना मोहित केले. रामजन्माचे मनोहारी सादरीकरण, श्रीकृष्ण जीवनातील होळीचा प्रसंग नृत्यातून उभा करण्यात आला.

सिटी ॲक्टिव्हिटी
रविवार, ९ नोव्हेंबर २०१४
औरंगाबाद
दिव्य सिटी .२



महागामी गुरुकुलाच्या सारंगदेव सभागृहात शनिवारी आयोजित नृत्यशृंखलेत नृत्य सादर करताना प्राजक्ता राज यांच्या संघातील कलावंत. छाया : माजिद खान

नृत्योत्सव | 'औरा औरंगाबाद' नृत्य शृंखलेत गौरीरमणा प्रस्तुतीतून भगवान शिवस्तुती

# नृत्यातून राम जन्माचे दर्शन

प्रतिनिधी | औरंगाबाद

प्रख्यात नृत्यांगना गुरू स्व. रोहिणी भाटे यांच्या शिष्या प्राजक्ता राज यांच्या चपळाईपूर्ण आणि अदाकारीने नटलेल्या नृत्य सादरीकरणाने रसिकांना मोहित केले. 'औरा औरंगाबाद' नृत्यशृंखलेचा दुसरा दिवस कथ्थक प्रस्तुतीने संस्मरणीय झाला. रामजन्माचे मनोहारी सादरीकरण, गौररमण भगवान शंकर तसेच श्रीकृष्ण जीवनातील होळीचा प्रसंग नृत्यातून उभा करण्यात आला.

महागामी गुरुकुलाच्या सारंगदेव सभागृहात शनिवारी सोहळा रंगला. कथ्थकच्या परंपरेप्रमाणे त्रिदेव स्तुतीने शिव, दुर्गा आणि कृष्णाला वंदन करत सादरीकरणाला सुरुवात झाली. कथ्थक नृत्यातील तंत्रशुद्ध प्रकाराचे दर्शन घडवणाऱ्या तीनतालाचे सादरीकरण नृत्यांगनेचे कौशल्य दाखवणारे होते. यांनतर दक्षयज्ञ ही अंगावर शहारे आणणारी प्रस्तुती झाली. पतीचा वडिलांकडून अवमान झाल्यानंतर स्वतःला यज्ञात झोकून देणाऱ्या देवी सतीची कहाणी यामध्ये दाखवण्यात आली. चैती या प्रस्तुतीत राम जन्मसोहळा दाखवण्यात आला. संत तुलसीदास रचित या रचनेने अतिशय भावपूर्ण वातावरण निर्मिती केली.

गौरीरमणा प्रस्तुतीतून भगवान शंकराचे सामर्थ्य दाखवण्यात आले. युगुल कीर्तन ही वैशिष्ट्यपूर्ण रचना या वेळी सादर करण्यात आली. ताल अदाकारीचे अतिशय समन्वयपूर्ण सादरीकरण रसिकांची दाद मिळवून गेले. राग हंसध्वनीमध्ये निबद्ध आणि ताल झपतालात बांधण्यात आलेला तराणा अतिशय ताकदीने सादर करण्यात आला. होळी नृत्यातून राधा गोपिकांसह कृष्णाची रंगलेली रासलीला वृंदावनातील प्रसंग उभे करणारी होती. समूह कीर्तनात नृत्यांगनेचे नृत्य सादरीकरण डोळ्यांचे पारणे फेडणारे ठरले. या वेळी महागामी संचालिका पार्वती दत्ता, सीआयआयचे पदाधिकारी, पर्यटक आणि रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महागामीची प्रस्तुती

महागामीच्या शिष्या कथ्थकचे सादरीकरण करून 'औरा औरंगाबाद' नृत्यशृंखलेचा तिसरा दिवस पर्यटकांसाठी विशेष बनवणार आहेत. हा कार्यक्रम विनाशुल्क असून सर्वांसाठी खुला आहे. कला रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दिव्य मराठी
# दिव्य सिटी
औरंगाबाद. शनिवार, १० जानेवारी २०१५



## विलोभनीय पदन्यास

सीआयआय आणि महागामी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ऑरा औरंगाबाद नृत्यशृंखलेच्या २८ व्या पर्वाची गुंफण भरतनाट्यम कलावंत आनंद सतचितानंदन आणि जयलक्ष्मी जयराम यांनी केली. दीड तास चाललेल्या या कार्यक्रमात भरतनाट्यमचा विलोभनीय पदन्यास सादर करत कलावंतांनी रसिकांच्या डोळ्याचे पारणे फेडले.

दैनिक लोकपत्र भूमिपुत्रांचा मित्र! शुक्रवार दि. ७ नोव्हेंबर २०१४ २

# एमजीएममध्ये आजपासून नृत्य शृंखलेचा प्रारंभ

## महागामी-सीआयआयचा संयुक्त उपक्रम

**औरंगाबाद / प्रतिनिधी –** औरंगाबादेत येणाऱ्या पर्यटकांना अभिजात भारतीय कलांच्या वैभवाचे दर्शन घडवण्यासाठी भारतीय उद्योग महासंघ आणि महात्मा गांधी मिशन संचलित महागामीच्या विद्यामाने 'औरा-औरंगाबाद'च्या नावाखाली शास्त्रीय नृत्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. ७ नोव्हेंबर २०१४ ते जानेवारी २०१५ असे तीन महिने शास्त्रीय नृत्य महोत्सव महागामीच्या गुरुकुलमध्ये होणार आहे. विशेष म्हणजे शास्त्रीय नृत्यातील विभिन्न कलांचे सादरीकरण या काळात केले जाणार आहे.

दोन महिने प्रत्येक आठवड्याच्या शुक्रवार, शनिवार व रविवारी असे तीन दिवस रात्री साडेसात ते साडेआठ वाजेच्या वेळेत शास्त्रीय नृत्यातील कथ्थक, ओडिसी, भरतनाट्यम्, कुचिपुडी, मोहिनीअट्टम् अशा विभिन्न कलांची नृत्यझंकार रसिकांना बघायला मिळेल. या नृत्यशृंखलेच्या कार्यक्रमाची सुरुवात शुक्रवारी ता.७ रोजी स्व. रोहिणी भाटे यांचे अमेरिकन शिष्य पंडित चित्रेश दास यांच्या कथ्थक नृत्याने होईल, अशी माहिती महागामीच्या संचालिका पार्वती दत्ता तसेच सीआयआयचे संचालक प्रशांत देशपांडे यांनी गुरूवारी पत्रपरिषदेत दिली. सलग तीन महिने आयोजित करण्यात आलेला हा औरा-औरंगाबाद नृत्य महोत्सव औरंगाबादेतील शास्त्रीय नृत्य रसिकांसाठी एका अर्थाने विशेष पर्वणीच ठरणार आहे. यावेळी देशपांडे म्हणाले, परदेशी पर्यंटकांम ध्ये भारतीय कलांबद्दल औत्सुक्य आहे. त्यामुळे हा कार्यक्रम विशेल लक्षणीय असतो.

मागील वर्षी औरा-औरंगाबाद नृत्यशृंखलेअंतर्गत १८ नृत्यांचे आयोजन करण्यात आले होते. आता आम्ही पुढील पाच वर्षे हा उपक्रम सातत्याने राबवणार आहोत. उपसंचालक आणि इड्रेस हाऊसिंगचे श्रीराम नारायण म्हणाले, पर्यटकांनी जास्तीत जास्त वेळ आपल्या शहरात घालवावा, म्हणून हा कार्यक्रम अत्यंत महत्वाचा आहे. यावेळी पार्वती दत्ता म्हणाल्या की, औरंगाबादने शिल्प, चित्रांतून जगाचे लक्ष वेधले. त्यावरच आधारित नृत्य सादरीकरण या कार्यक्रमात येणारा प्रत्येकजण करणार आहे. प्रत्येक कार्यक्रमाला हजरी लावून शहरवासीयांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन पार्वती दत्ता यांनी केले.

यावेळी महागामी गुरूकुलाच्या संचालिका पार्वती दत्ता, सीआयआयचे समन्वयक अमोल मोहिते, एमजीएम वृत्तपत्र विभागाच्या प्राचार्या डॉ. रेखा शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती.

हा महोत्सव औरंगाबादेतील शास्त्रीय नृत्य रसिकांसाठी एका अर्थाने विशेष पर्वणी ठरणार आहे. परदेशी पर्यटकांमध्ये भारतीय कलांबद्दल औत्सुक्य आहे. त्यामुळे हा कार्यक्रम विशेष लक्षणीय असतो.

दैनिक लोकपत्र भूमिपुत्रांचा मित्र! संमिश्र सोमवार दि. १० नोव्हेंबर २०१४ १२

## कथ्थक



एमजीएममधील महामागीच्या गुरुकुलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'औरा औरंगाबाद' या शास्त्रीय नृत्यशृंखलेत मनमोहक कथ्थक आणि ओडिसी नृत्य सादर करण्यात आले.

# नृत्यातून अर्धनारीनटेश्वराची कथा

प्रतिनिधी | औरंगाबाद

ऑरा औरंगाबाद नृत्य शृंखलेचे २५ वे पुष्प ओडिसी गुरू शुभदा वराडकर यांच्या शिष्यांनी गुंफले. महागामीच्या शारंगदेव सभागृहात शुक्रवारी वराडकर यांच्या शिष्यांनी अर्धनारीनटेश्वराची रोमांचकारी कथा नृत्यातून सादर केली.

महागामीतील शांत संध्याकाळी मंद प्रकाश आणि घुंगरांच्या मंजूळ स्वरांनी मिताली वराडकर, श्रेया सबरवाल, मृण्मयी साटम यांनी रंगमंचाचा ताबा घेतला. ओडिसी नृत्याच्या परंपरेनुसार आधी भगवंत, गुरु आणि रसिकांना 'मंगलाचरण' या प्रस्तुतीतून नमन केले जाते. श्रेष्ठ कविवर्य जयदेव यांच्या गीतगोविंदममधील अष्टपदीवर आधारलेली ही रचना दानवांचा नाश करण्यासाठी विष्णूने घेतलेल्या विविध अवतारांची स्तुती करणारी होती. नृत्य-नाट्यातील नवरसांचे दर्शन या रचनेतून घडवण्यात आले.

जनसंमोहिनी रागात बांधलेली 'पल्लवी' ही रचना नृत्यसाधनेचा परिचय देणारी होती. शंकराच्या 'अर्धनारीनटेश्वर' स्तोत्रावर आधारलेली रचना पाहणे रसिकांसाठी रोमांचकारी अनुभव होता. पार्वती आणि शिव यांचा संगम असलेला हा अवतार असल्याने नृत्यातही लास्य आणि तांडव अशा दोन प्रकृती नृत्यांगनांनी ताकदीने दाखवल्या. 'मोक्ष' या अंतिम प्रस्तुतीने त्यांनी रंगमंचाचा निरोप घेतला. नृत्यातील समन्वय, शब्द-लय-ताल यांचे अचूक ज्ञान त्यांच्या नृत्यातून झळकत होते. खऱ्या अर्थाने आनंद देणारे नृत्य तिघींनी सादर केले.



महागामीच्या शारंगदेव सभागृहात नृत्य सादर करताना शुभदा वराडकर यांच्या शिष्या. छाया : दिव्य मराठी

## व्यासपीठ आणि पर्यटकांना परिचय

ऑरा औरंगाबाद नृत्य शृंखलेदरम्यान विविध शास्त्रीय नृत्य प्रकारांचे आयोजन केले. यामध्ये नवकलावंतांना रंगमंच देणे आणि पर्यटकांना आपल्या भारतीय कलांचे दर्शन घडवणे हा उद्देश आहे. आमच्या प्रयत्नांना यश येत आहे.

**पार्वती दत्ता,** संचालिका महागामी

औरा औरंगाबाद नृत्य शृंखलेचे २५ वे पुष्प ओडिसी गुरु शुभदा वराडकर यांच्या शिष्यांनी गुंफले. महागामीच्या शारंगदेव सभागृहात शुक्रवारी त्यांनी अर्धनारीनटेश्वराची रोमांचकारी कथा नृत्यातून सादर केली.

सिटी ॲक्टिव्हिटी | शुक्रवार. ७ नोव्हेंबर २०१४ औरंगाबाद. | दिव्य सिटी .२

# ‘औरा-औरंगाबाद’ नृत्य शृंखला आजपासून सुरू

प्रतिनिधी | औरंगाबाद

संपूर्ण जगाचे लक्ष वेधणाऱ्या शिल्पकला, चित्रकलांची दैवी भेट लाभलेल्या औरंगाबादेत पर्यटकांची मोठी वर्दळ असते. या पर्यटकांना अभिजात भारतीय कलांच्या वैभवाचे दर्शन घडवण्यासाठी भारतीय उद्योग महासंघ (सीआयआय) आणि महागामीच्या विद्यमाने ‘औरा-औरंगाबाद’ या नृत्य शृंखलेचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, ८ नोव्हेंबरला स्व. रोहिणी भाटे यांचे अमेरिकन शिष्य पं. चित्रेश दास यांच्या कथ्थक नृत्याने कार्यक्रमाची सुरुवात होत आहे. सायंकाळी ७.३० ते ८.३० दरम्यान हे कार्यक्रम होणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

या वेळी महागामी गुरुकुलाच्या संचालिका पार्वती दत्ता, सीआयआयचे संचालक प्रशांत देशपांडे, उपसंचालक आणि इंड्रेस हाउझिंगचे श्रीराम नारायण, समन्वयक अमोल मोहिते, एमजीएम वृत्तपत्र विद्या विभागाच्या प्राचार्या डॉ. रेखा शेळके यांची उपस्थिती होती. या वेळी देशपांडे म्हणाले, महागामी गुरुकुलाच्या प्रांगणात जानेवारीपर्यंत प्रत्येक शुक्रवार, शनिवार आणि रविवारी भारतीय पारंपरिक नृत्यांची पर्वणी पर्यटकांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. परदेशी पर्यटकांमध्ये भारतीय कलेबद्दल औत्सुक्य आहे, त्यामुळे हा कार्यक्रम विशेष लक्षणीय असतो. मागील वर्षी औरा औरंगाबाद शृंखलेअंतर्गत १८ नृत्यांचे आयोजन करण्यात आले. आता आम्ही पुढील ५ वर्षे हा उपक्रम सातत्याने राबवणार आहोत. श्रीराम म्हणाले, भारतीय शिल्पकला, चित्रकला आणि अभिजात कलांचे आकर्षण जगभराला भुरळ घालणारे आहे. यानिमित्ताने पर्यटक आपल्याकडे येतात, त्यायोगे उद्योगातही गुंतवणूक त्यांनी करावी, असा आमचा मानस आहे. पर्यटकांनी जास्तीत जास्त वेळ आपल्या शहरात घालवावा म्हणून हा कार्यक्रम विशेष महत्त्वाचा आहे. दिवसभर पर्यटनानंतर रात्री नृत्योत्सवाची अनुभूती पर्यटकांसाठी पर्वणी ठरेल, असा आम्हाला विश्वास आहे.

दत्ता म्हणाल्या, औरंगाबादने शिल्प-चित्रांतून जगाचे लक्ष वेधले, त्यावरच आधारित नृत्य सादरीकरण या कार्यक्रमात येणारा प्रत्येक संघ करणार आहे. प्रत्येक कार्यक्रमाला हजेरी लावून शहरवासीयांनी याचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन दत्ता यांनी केले.

दैनिक लोकपत्र | भूमिपुत्रांचा मित्र! | संमिश्र | रविवार दि. ९ नोव्हेंबर २०१४ | ३



एमजीएममधील महागामीच्या गुरुकुलमध्ये महागामी-सीआयआयतर्फे आयोजित ‘औरा-औरंगाबाद’ या शास्त्रीय नृत्यशृंखलेत शनिवारी पुणे येथील प्राजक्ता राज आणि त्यांच्या शिष्यांनी कथ्थक नृत्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. (छाया - राजेश मुलकेवार)

शनिवार, ८ नोव्हेंबर २०१४ | पुण्य नगरी | औरंगाबाद वृत्तवेध



महागामीतर्फे ‘औरा औरंगाबाद’ नृत्यसंध्येस प्रारंभ झाला असून, प्रसिद्ध चित्रेश दास यांच्या शिष्या नृत्यांगणा सीमा मेहत्ता यांनी दुर्गास्तुती’ सादर करीत सर्वांच्याच डोळ्यांची पारणे फेडली. सुशोभित रंगमंच आणि नृत्यांगणांच्या सान्निध्यात एकाहून एक नृत्य सादर करीत उपस्थितांची दाद मिळवली.

औरंगाबादने शिल्प-चित्रांतून जगाचे लक्ष वेधले, त्यावरच आधारित नृत्य सादरीकरण या कार्यक्रमात येणारा प्रत्येक संघ करणार आहे. प्रत्येक कार्यक्रमाला हजेरी लावून शहरवासीयांनी याचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन पार्वती दत्ता यांनी केले.

पुण्याच्या नृत्यांगना प्रिया निमकर जोशी यांचे सौंदर्यपूर्ण सहा प्रस्तुती रसिकांना खिळवून ठेवणाऱ्या, तर साधकांसाठी पर्वणी ठरल्या. भरतनाट्यम नृत्याची ही उत्सवाची पहिली प्रस्तुती होती.

सिटी वुमेन | मंगळवार, १८ नोव्हेंबर २०१४ | औरंगाबाद | दिव्य सिटी . ४



शारंगदेव सभागृहात महागामी येथे रंगमंचावर विष्णुस्तुती करत भगवान विष्णूची विविध रूपे सादर करताना नृत्यांगना. छाया : माजिद खान

नृत्योत्सव | प्रिया निमकर-जोशी यांनी दशावतारातून रसिकांना केले स्तब्ध

# 'नारायणि नमोस्तुते' मधून विष्णुस्तुतीचे सादरीकरण

प्रतिनिधी | औरंगाबाद

भरतनाट्यम्‌चे सौंदर्यपूर्ण पदन्यास, संवाद साधणाऱ्या भावमुद्रा आणि अदाकारीने 'नारायणि नमोस्तुते' हा बहारदार कार्यक्रम शारंगदेव सभागृहात रंगला. पंडित सुचेता चापेकरांच्या शिष्या प्रिया निमकर-जोशी यांच्या सामर्थ्यपूर्ण नृत्यशैलीचा साक्षीदार असलेला प्रत्येक रसिक अंतर्मुख झाला. भारतीय नृत्यकलेचा अभिमान वाटावा, अशा प्रियाच्या सादरीकरणाने रसिकांना मोहिनी घातली.

रंगमंचावर पडणारा प्रकाश आणि कानावर येणारे स्वर रसिक मनाला आर्त करत होते. विष्णुसहस्त्रनामातील स्तोत्रांच्या साथीने विष्णुस्तुतीच्या प्रस्तुतीसाठी नृत्यांगना मंचावर आली. नृत्यातून भगवान विष्णूला आवाहन करण्यात आले. मंदिराच्या गर्भगृहात होणारी मलारी ही दुसरी प्रस्तुती अंतर्नाद खुलवणारी होती. नागस्वरम्‌वर वाजवली जाणारी ही रचना होती. द्रुतलयीतील शुद्ध नर्तन तिल्लानामध्ये दाखवण्यात आले. विष्णूला समर्पित ही रचना नृत्यसाधनेचा परिचय देणारी होती.



'नारायणा रमारमणा' या गाजलेल्या नाट्यपदाने प्रियाने रसिकांचा निरोप घेतला. हे नाट्यपद प्रत्येक रसिकाची दाद मिळवणारे आणि महाराष्ट्राच्या कलासाधनेचा तसेच योगदानाचा परिचय देणारे होते. तृप्त मनाने रसिकांनी निरोप घेतला. पर्यटकांना भारतीय कलांचा परिचय देण्याच्या दृष्टीने सीआयआय आणि महागामीच्या वतीने हे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक आठवड्याच्या शुक्रवार ते रविवार होणाऱ्या या महोत्सवाला रसिकांनी हजेरी लावावी, असे आवाहन करण्यात आले.

## अष्टपदीचे आकर्षण

अकराव्या शतकात होऊन गेलेल्या कवी जयदेवी यांच्या गीत गोविंदम्‌मधील अष्टपदीची रचना दशावतार सामर्थ्यपूर्ण नृत्याने नृत्यांगनेने उभी केली. यामध्ये वीर, शांत, रौद्र अशा विविध रसांचा समावेश होता. जेव्हा जेव्हा धर्माचा विनाश होतो, राक्षस विश्वाला भयाच्या कवेत घेतात तेव्हा शांती आणि स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी भगवान विष्णू वेगवेगळ्या रूपांत पृथ्वीवर कसे अवतरित होतात, हे दाखवणारी ही सुंदर रचना सादर करण्यात आली.

सिटी स्कॅन | रविवार, १६ नोव्हेंबर २०१४ | औरंगाबाद | दिव्य सिटी . ३

# भरतनाट्यम पदन्यासाची अलौकिक पर्वणी

नृत्योत्सव | औरा औरंगाबाद महोत्सवात पुण्याच्या प्रिया निमकर-जोशीची अदाकारी

प्रतिनिधी | औरंगाबाद

अठराव्या शतकातील तामिळनाडूतील उथ्थुकडू व्यंकटसुब्बा अय्यर कवी यांनी रचलेली 'कृष्णायन' नृत्यप्रस्तुती औरा औरंगाबाद नृत्योत्सवाची लक्षणीय प्रस्तुती ठरली. पुण्याच्या नृत्यांगना प्रिया निमकर जोशी यांचे सौंदर्यपूर्ण सहा प्रस्तुती रसिकांना खिळवून ठेवणाऱ्या, तर साधकांसाठी पर्वणी ठरल्या. भरतनाट्यमची नृत्याची ही उत्सवातील पहिली प्रस्तुती होती.

महागामीच्या शारंगदेव सभागृहात हा विलक्षण सुंदर कार्यक्रम दीड तास रसिकांना भुलवणारा ठरला. 'श्री विघ्नाराजम भजे' या गणेशस्तुतीपर नृत्याने प्रियाने सुरुवात केली. अडथळे दूर करून सर्वांना शांती प्रदान करण्याची प्रार्थना यामध्ये करण्यात आली. 'स्वागतम कृष्णा' ही भक्ताने श्रीकृष्णाला घातलेली साद लालित्यपूर्णरीत्या सादर करण्यात आली. पदन्यासाची विलक्षण जादूगिरी असलेल्या या नृत्यातून कृष्णाच्या नृत्यप्रतिभेचे दर्शन घडवण्यात आले. श्रीकृष्णाचे वेणुवादन संपूर्ण जगाला मोहिनी घालणारे होते. त्याचे सौंदर्य नृत्यातील नजाकतीतून दाखविताना प्रिया यांनी साक्षात श्रीकृष्ण सर्वांपुढे उभे केले. मोराच्या विलक्षण लहेजेदार हालचाली नृत्यातून दाखविताना प्रियाने दाखविलेल्या भावमुद्रा, हस्तमुद्रा रसिकांची दाद घेऊन गेल्या. कलिंग नर्तना तिल्लाना या नृत्यातून कालिया मर्दनाचा प्रसंग दाखवताना अंगावर शहारेच आणले. श्रीकृष्णाने कालिया नागाशी पाण्याखाली केलेले युद्ध, त्यानंतर कालियाच्या फण्यावर उभे राहून केलेले नृत्य सर्वांनाच भरतनाट्यम नृत्य साधनेचे सामर्थ्य दाखवणारी ठरले. आदितालातील ही रचना भरतनाट्यमचे वैभव खुलवणारी होती. महागामी संचालिका पार्वती दत्ता यांची या वेळी उपस्थिती होती. संगीत क्षेत्रातील मान्यवरही मोठ्या संख्येने उपस्थित होते.



प्रिया निमकर- जोशी यांनी सहकलारांसह 'कृष्णयन' ही रचना सादर केली.

रविवार, दि. ७ डिसेंबर २०१४
दैनिक लोकपत्र — भूमिपुत्रांचा मित्र!



महागामी प्रस्तुत औरा – औरंगाबाद नृत्य मालिकेत ओडिसी नृत्य सादर करताना डॉ. संगीता राजन आणि अण्णु नारायण. (छाया – राजेश मुलकेवार)

अदाकारी आणि अभिनयाने परिपूर्ण नृत्याचे मनोहारी दर्शन सर्जनशील ओडिसी नृत्यांगना दक्षा मशरुवाला यांच्या चार शिष्यांनी औरा औरंगाबाद नृत्य शृंखलेत नृत्यातील नजाकत दाखवत उपस्थितांना पारंपरिक ओडिसी नृत्याचे पैलू दाखवले.

सिटी वुमेन | मंगळवार, २५ नोव्हेंबर २०१४ | औरंगाबाद | दिव्य सिटी .४

नृत्य महोत्सव | तिसऱ्या पर्वात संध्या पुरेचा यांच्या शिष्यांनी सादर केला नृत्याविष्कार

# महालक्ष्मी अष्टकम, नटराज कौत्वकम नृत्याने वेधले लक्ष

## नृत्यातून शक्ती आणि सामर्थ्याचे घडवले दर्शन

प्रतिनिधी | औरंगाबाद

पर्यटकांना अभिजात भारतीय नृत्य परंपरांचे दर्शन घडविणाऱ्या औरा-औरंगाबाद नृत्य शृंखलेच्या तिसऱ्या पर्वातील तीन दिवसांमध्ये संध्या पुरेचा यांच्या शिष्यांनी भरतनाट्यमच्या नृत्याविष्काराचे दर्शन घडविले. नटराज कौत्वकम आणि महालक्ष्मी अष्टकम, मधुराष्टकम, 'भो शंभो' आदी सादरीकरणातून त्यांनी आपल्या नृत्यशैलीचे वेगळेपण दाखवून दिले.

महागामीच्या शारंगदेव सभागृहात झालेल्या नृत्याने रसिकांना अलौकिक नृत्य प्रदर्शन घडविले. सर्फोजी शिंदे विद्यापीठात नृत्यगुरू संध्या पुरेचा यांच्या मार्गदर्शनात नृत्यसाधना करणाऱ्या मंदिरा जोशी, सुरभी पारकर, नवनीत पाटील यांनी संस्मरणीय सादरीकरण केले.

नटराज कौत्वकमने त्यांनी सादरीकरणाची सुरेख सुरुवात केली. यामध्ये भगवंताची शक्ती, सामर्थ्याचे दर्शन घडवत त्यांच्या मृदपणाचाही परिचय देण्यात आला. भगवान शंकराने केलेल्या तांडव नृत्याची झलकही यामध्ये दाखविण्यात आली. स्तुतीपर या रचनेनंतर अलारिपूचे सादरीकरण करण्यात आले. राग यदुकुळकंबोडीमध्ये निबद्ध आदितालातील कलईतुकी ही पदम रचना प्रस्तुत करण्यात आली. मारीमुथ्थू पिल्लई यांनी नृत्य सादरीकरण केले. दक्षिणेतील चिदंबरम मंदिरात करणाऱ्या रचेनेत भगवान शंकराचा पुत्र कार्तिकेय, पार्वती, शिरावर धारण केलेल्या गंगेचे वर्णन यात करण्यात आले. मधुराष्टकम या रचनेत १६ व्या शतकात होऊन गेलेल्या भक्तिमार्गातील गुरू वल्लभाचार्य याची कहाणी सांगण्यात आली. वल्लभाचार्यांनी पुष्टीमार्गाचा प्रारंभ केला, ते देवाच्या विचारांनी इतके प्रेरित होते की, त्यांना देवाशिवाय इतर कुणीही दिसत नसे. भक्तीने ओतप्रोत अशा या रचनेनंतर महालक्ष्मी अष्टकम ही सौंदर्यपूर्ण रचना नृत्यांगनांनी प्रचंड ताकदीने सादर केली.

मिश्र एकतालातील पुन्नगवराली रागातील या रचनेतील श्लोकातून लक्ष्मीदेवीची स्तुती करण्यात आली. यानंतर आदिशंकराचार्य रचित पंचाक्षरास्तोत्र ही रचना सादर करण्यात आली. नमशिवायः रचना रसिकांची दाद मिळवून गेली.

### 'भो शंभो'ची नृत्यप्रस्तुती



नृत्याचा आदिदेव नटराज याचा समर्पित 'भो शंभो'या रचनेने नृत्यांगनांनी रसिकांचा निरोप घेतला. रेवाती रागातील आदितालात बांधलेली ही रचना अलौकिक पदन्यास, हस्तमुद्रा आणि भावाभिनयाने परिपूर्ण होती. ब्रह्मा आणि विष्णू दोघे भगवान शंकराकडे येतात आणि दोघांतील श्रेष्ठ कोण याचा निर्णय मागतात. तेव्हा भगवान शिवशंकर शिवलिंगाचा उगम आणि शेवट शोधून आणा असे त्यांना सांगतात. मग ब्रह्म हंसाला तर विष्णू वराहाला याकामी पाठवितात, मात्र भगवान शंकर सर्वश्रेष्ठ आहेत, हा शोध त्यांना लागतो आणि ते त्यांचे मोठेपण मान्य करतात अशी ही विलक्षण रचना रसिकांवर मोहिनी घालणारी ठरली.

सिटी स्कॅन | सोमवार, १ डिसेंबर २०१४ | औरंगाबाद | दिव्य सिटी .३

# परिपूर्ण नृत्य प्रस्तुतींचे मनोहारी दर्शन

नृत्योत्सव

## औरा औरंगाबाद नृत्य शृंखलेत ओडिसी नृत्याचा अविस्मरणीय आविष्कार



प्रतिनिधी | औरंगाबाद

अदाकारी आणि अभिनयाने परिपूर्ण नृत्याचे मनोहारी दर्शन सर्जनशील ओडिसी नृत्यांगना दक्षा मशरुवाला यांच्या चार शिष्यांनी औरा औरंगाबाद नृत्य शृंखलेत नृत्यातील नजाकत दाखवत उपस्थितांना पारंपरिक ओडिसीनृत्याचे पैलू दाखवले.

पर्यटकांना भारतीय नृत्य कलेचा आणि स्थापत्यशास्त्राची गुंफण दाखवण्याचा प्रयत्न या नृत्यांतून केला जात आहे. कथ्थक आणि भरतनाट्यम नृत्यांचे वैविध्यपूर्ण दर्शन घडवल्यानंतर ओडिसी नृत्याच्या रंगमंचावर अद्भुत प्रस्तुती रसिकांसाठी पर्वणी ठरली. मंगलाचरण या प्रस्तुतीने त्यांनी सुरुवात केली. माणिक्यवीणा ही कालिदास रचित श्लोकमाला होती, यामध्ये भगवान जगन्नाथाला नमन करून भूमिवंदना आणि रसिकांनाही प्रणाम करण्यात आला. चतुरस्त्र आणि मिश्र तालात बांधलेली रागमालिकेवर आधारलेली ही सौंदर्यपूर्ण रचना होती. यामध्ये नृत्यातील भक्तिभाव अतिशय सहजतेने नृत्यांगनांनी रसिकांपर्यंत पोहोचवले. शंकाभरणम पल्लवी या दुसऱ्या नृत्यातील सहज सुंदर शुद्ध नर्तन होते. नजाकत, हस्तमुद्रांचा कौशल्यपूर्ण वापर या प्रस्तुतीचे बलस्थान होते. राग शंकाभरणम आणि एकताली यात निबद्ध ही रचना होती.

'धीरे समये यमुना तीरे' ही अष्टपदी शृंगाररसाने परिपूर्ण होती. यामध्ये कवी जयदेव यांच्या गीत गोविंदममधील ही अर्थपूर्ण राधाकृष्ण प्रेमरचना रसिकांना भारावून टाकणारी होती. भैरवी रागावर आधारलेली मोक्ष ही रचना नयनरम्य सादरीकरणासोबतच रसिकांनी संमोहित करणारी ठरली. या संपूर्ण सादरीकरणात नृत्याच्या मुद्रा, अभिनय कौशल्य आणि एखाद्या वेलीप्रमाणे सळसळता अनुभव देणारी नजाकत ललित्यपूर्ण ठरली.

नृत्याची तरलता, आंगिक अभिनयासोबतच प्रत्यंगांचा समन्वय नृत्याची गहराई सांगणारा होता. गुरूच्या तालमीचे वैशिष्ट्य नृत्यातही अवतरलेले दिसून आले. अजिंठा, वेरूळच्या शिल्पांमध्ये दिसणाऱ्या भंगिमा या प्रस्तुतींमध्ये नृत्यांगनेने लीलया दाखवल्या. या सादरीकरणात दिव्या शर्मा, सुव्रता त्रिपाठी, ध्रुवी जैन आणि सिद्धी वाईकर चौघींनीही नृत्यसाधनेचा विलक्षण परिचय दिला.

दैनिक भास्कर | **शहर** | औरंगाबाद, शुक्रवार 7 नवंबर, 2014 | 15

# तीन दिवसीय भारतीय क्लासिक नृत्य आज से

## कला, पर्यटन, सांस्कृतिक धरोहर को बढ़ावा देने का प्रयास

विशेष संवाददाता | औरंगाबाद

महात्मा गांधी मिशन संचलित महागामी गुरुकुल एकैडमी और सीआईआई के संयुक्त तत्वावधान से सिडको एन-6 एमजीएम परिसर में आज से तीन दिवसीय औरा नाम से भारतीय क्लासिक नृत्य की साधना दिखाई देगी। यह जानकारी महागामी की संचालिका पार्वती दत्ता ने दी।

पार्वती ने बताया कि ऐतिहासिक शहर की अस्मिता, कला, संस्कृति तथा पर्यटन को बढ़ावा देने के मुख्य उद्देश से महागामी द्वारा तीन दिवसीय औरा नाम से क्लासिकल नृत्य रखा गया है। इसमें नामी नृत्यगांना अपनी कला से दर्शकों को मंत्रमुग्ध करेंगी। 7 से 9 नवंबर तक शाम 7.30 से 8.30 बजे तक नृत्य कार्यक्रम होगा। इस नृत्य साधना के लिए बागला ग्रुप सहयोग दे रहा है।

इस तरह की नृत्य साधना हर सप्ताह नए साल तक लेने का निश्चय किया गया है। तीन दिन में 30 भारतीय क्लासीक डान्स पेश किए जाएंगे। इसमें शिवा, दशा अवतार, रामायण, महाभारत, बुद्धा के साथ ही एलोरा, अजंता, दौलताबाद, बीबी का मकबरा, घृष्णेश्वर मंदिर आदि से संबंधित बैनर लगाए जाएंगे। इसमें कथक, उड़िसा, भरतनाट्यम, मोहिनी अट्टम, कुचीपुड़ी आदि प्रकार शामिल हैं।

### यह कलाकार होंगे शामिल

मनीषा साठे (कथक), सुचीता चापेकर (भरतनाट्यम), जयश्री नायर (मोहिनी अट्टम), पंडित चित्रेश दास, दीपिका रेड्डी (कुचीपुडी) आदि कलाकार शामिल होंगे। कार्यक्रम में भारतीय नागरिकों के साथ ही विदेशी टूरिस्टों को भी आकर्षित करने का प्रयास किया जा रहा है। मुगल काल में उत्तर प्रदेश से कई नृत्य प्रकार यहां प्रचलित हुए। औरा यानी क्रांति आभा है। हेरिटेज पर डान्स फोकस करना हमारा उद्देश है। प्रेसवार्ता में सीआईआई के उपाध्यक्ष श्रीराम नारायण ने बताया कि सभी बसस्थानक, होटल्स, एयरपोर्ट, टूर ऑपरेटर्स के पास नृत्य की प्रसिद्धी की जा रही है। प्रेसवार्ता में सीआईआई के प्रशांत, प्रो. रेखा शेलके, अमूल मोहिते उपस्थित थे।

दैनिक **लोकपत्र** भूमिपुत्रांचा मित्र! | सोमवार दि. ५ जानेवार २०१५ | ३

**औरा औरंगाबाद**



एमजीएममध्ये महागामीतर्फे आयोजित 'औरा औरंगाबाद' या शास्त्रीय नृत्य श्रृंखलेत शनिवारी मुबई येथील अर्चिता मेहता व एस.गीता यांनी भरतनाट्यम्‌चा मनोवेधक आविष्कार सादर करून रसिकांची मने जिंकली. छाया:राजेश मुलकेवार

ऐतिहासिक शहर की अस्मिता, कला, संस्कृति तथा पर्यटन को बढावा देने के मुख्य उद्देश्य से महागामी द्वारा औरा औरांगबाद नाम से शास्त्रीय नृत्य महोत्सव रखा गया है. इसमें नामी नृत्यांगाना अपनी कला से दर्शकों को मंत्रमुग्ध करेंगी.

रविवार, १६ नोव्हेंबर २०१४
# पुण्य नगरी
औरंगाबाद वृत्तवेध

## कृष्णलीलांच्या शास्त्रीय नृत्याने आणली रंगत

औरंगाबाद/प्रतिनिधी

लाडक्या श्रीकृष्णांच्या विविध रूपांचे तसेच लीलांचे वर्णन पारंपरिक शास्त्रीय संगीत, नृत्यांद्वारे एकाहून एक प्रस्तुती सादर करून उत्तरोत्तर सायंकाळ रंगत गेली. एमजीएमच्या महागामी गुरूकुलात आयोजित 'औरा-औरंगाबाद' तर्फे ५ वे पुष्प गुंफण्यात आले. या कार्यक्रमात गुरू डॉ. सुचेता चापेकर यांच्याकडून शिष्य प्रियंका निमकर जोशी भरतनाट्यम् शिकल्या. गुरू डॉ. वसुंधरा श्रीधरन् यांच्याकडून पंढानालूर या प्रकारातील प्रशिक्षण घेतले. महागामीच्या पाचव्या पुष्पात त्या नृत्यांगणा प्रियंका आणि ग्रुप मिळून 'कृष्णरंग' ही प्रस्तुती सादर केली.

यात सर्वांच्या लाडक्या श्रीकृष्णाच्या अद्भुत व विविध रंगांची नृत्याद्वारे कला सादर करण्यात आली. श्रीकृष्णाच्या बालरूप, मित्र, सखा आणि प्रियकर म्हणून त्यांच्या जीवनावरील चरित्रांवर आधारित नृत्यछटा सादर करण्यात आल्या.

शिवशंकर आणि पार्वतीचा पुत्र असलेले 'गणेशा' यांच्या वंदनेत त्यांची स्तुती प्रस्तुती श्री वृंदारंगम बाजेमध्ये सादर करण्यात आले. यानंतर गुरू श्री गुरू डॉ. सुचेता चापेकर यांनी कोरिओग्राफी केलेल्या कृष्ण कटूकम या प्रस्तुतीत बालकृष्ण, प्रियकर आणि जगतपालक या श्रीकृष्णांच्या तीन रूपांचे वर्णन भरतनाट्यम च्या



मध्यमाने सादर करण्यात आले. यानंतर अभिनय पदामध्ये 'सांगती खोटे त्या गवळणी' हे बालपणाच्या नटखट लीलांचे वर्णन व गोपीकांवर आधारित नृत्याविष्कार सादर करण्यात आले. यानंतर एकाहून एक अप्रतिम शास्त्रीय संगीत, नृत्याच्या माध्यमाने महागामीतील संध्या अविस्मरणीय ठरली.

सर्वांच्या लाडक्या श्रीकृष्णाच्या अद्भुत व विविध रंगांची नृत्याद्वारे कला सादर करण्यात आली. श्रीकृष्णाच्या बालरुप, मित्र, सखा आणि प्रियकर म्हणून त्यांच्या जीवनावरील चरित्रांवर आधारित नृत्यछटा सादर करण्यात आल्या.

दैनिक भूमिपुत्रांचा मित्र!
# लोकपत्र
सोमवार दि. १२ जानेवारी २०१५ ३

## औरा औरंगाबाद

**सीआयआय व महागामी यांच्या संयुक्त विद्यमाने एमजीएममध्ये आयोजित 'औरा औरंगाबाद' नृत्यश्रृंखलेच्या २१ व्या पर्वात अमृता गोगटे, अस्मिता ठाकूर आणि त्यांच्या सहकारी नृत्यांगणांनी शनिवारी कथ्थक नृत्याचा आविष्कार सादर करून उपस्थितांची मने जिंकली.**



अनू नारयण आणि डॉ. संगीथा राजन यांनी ओडिसी नृत्याची अप्रतिम प्रस्तुती केली. अर्धनारीनटेश्वराचे अभिनयाने परिपूर्ण नृत्य रोमांचित करणारे ठरले. पारंपरिक वेशभूषा आणि रंगभूषेत त्यांनी मंचाचा तबा घेतला.

मंगळवार ९ डिसेंबर, २०१४
औरंगाबाद
दिव्य सिटी .४

# अर्धनारीनटेश्वराची ओडिसी नृत्यप्रकारातून अप्रतिम प्रस्तुती

## औरा-औरंगाबाद नृत्यशृंखलेत नृत्य पर्वणी

प्रतिनिधी | औरंगाबाद

भारतीय नृत्यकलेचा वारसा जपण्यासोबतच पर्यटकांना याची ओळख करून देण्यासाठी आयोजित औरा. औरंगाबाद नृत्यशृंखलेचे १३ वे पुष्प शुक्रवारी गुंफण्यात आले. अनू नारायण आणि डॉ. संगीथा राजन या डेबी बासू यांच्या शिष्यांनी ओडिसी नृत्याची अप्रतिम प्रस्तुती केली. अर्धनारीनटेश्वराचे अभिनयाने परिपूर्ण नृत्य रोमांचित करणारे ठरले.



अनू नारायण, डॉ. संगीथा राजन यांनी अर्धनारीनटेश्वर नृत्य सादर केले.

महागामीच्या शारंगदेव सभागृहात हे नृत्य सादरीकरण झाले. या वेळी रसिक प्रेक्षक, पर्यटकांची उपस्थिती होती. सीआयआय आणि महागामीच्या विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महागामी संचालिका पार्वती दत्ता यांच्या नियोजनात हे पुष्प गुंफण्यात आले आहे. घुंगरांच्या मंजूळ आवाजाने दोन्ही नृत्यांगनांनी रंगमंचावर हळूवारपणे प्रवेश केला. पारंपरिक वेशभूषा आणि रंगभूषेत त्यांनी मंचाचा ताबा घेतला. सिमहेंद्र पल्लवी या ओडिसीच्या पारंपरिक नृत्य प्रकाराने त्यांनी सादरीकरणाची सुरुवात केली. संपूर्ण आनंदानुभव देणारे हे शुद्ध नर्तन दाखवताना नृत्यांगनांनी सुरेख संगम साधला. तालबद्ध नृत्यातून अभिनयाचीही चित्तवेधक अदाकारी त्यांनी केली. शिल्पांमध्ये बहुसंख्य वेळा आढळणाऱ्या पदमुद्रा आणि हस्तमुद्रांचा मिलाफ यामध्ये नृत्यांगनांनी कौशल्याने दाखवला.

साभिनया या दुसऱ्या प्रस्तुतीत नृत्यांगनांनी एक कथा दाखवली. भगवान श्रीकृष्णाला पहिल्यांदा पाहिलेल्या खेड्यातील एका मुलीने आपल्या मैत्रिणीकडे केलेले हे वर्णन होते. चपळाईपूर्ण, लचकदार नृत्य करताना नृत्यांगनांनी कृष्णलीला सर्वांपुढे उभी केली.

सादरीकरणाला शेवटाकडे नेताना अर्धनारीनटेश्वरा प्रस्तुती रागा मालिकेवर आधारलेली होती. लास्य आणि तांडव यांचा मिलाफ असलेले हे नृत्य रोमांचित करणारे ठरले. दोन विरुद्ध प्रकृती शिव आणि पार्वती यांचे अतिशय तालबद्ध असे हे नृत्य होते.

DB स्टार औरंगाबाद ▪ बुधवार, १२ नोव्हेंबर २०१४ सिटी ॲक्टिव्हिटी २

नृत्योत्सव। नृत्य महोत्सवाच्या तिसऱ्या दिवसी महागामीचे मंत्रमुग्ध करणारे प्रदर्शन

# 'सावरा गिरिधर मोहे मन भाये रे...' सौंदर्यपूर्ण रचनेतून नृत्यसामर्थ्याचे दर्शन



## औरा औरंगाबादच्या नृत्य महोत्सवात कथ्थकचे वैविध्यपूर्ण सादरीकरण करण्यात आले.

डीबी स्टार• औरंगाबाद

'औरा औरंगाबाद नृत्यशृंखले'च्या तिसऱ्या दिवशी दर्जेदार सादरीकरण करत महागामीच्या नृत्यांगनांनी नृत्य साधनेचा परिचय दिला. कथक नृत्य प्रस्तुतीत आंगिकम, किरवाणी तराना, सावरा, तीन ताल, निरातत ढंग, सुफरण सारख्या वैविध्यपूर्ण नृत्यांतून रसिकांना दर्जेदार पर्वणी दिली. 'सावरा गिरिधर मोहे मन भाये रे' या नृत्यातून कृष्णाच्या मोहिनी घालणाऱ्या रूपाचे दर्शन घडवत नृत्यांगनांनी सुंदर नृत्य सादर केले.

सीआयआय व महागामीच्या विद्यमाने आयोजित नृत्यशृंखलेचा विदेशी पर्यटकांना समृद्ध भारतीय कलांचे दर्शन घडवणे हा उद्देश आहे. पहिल्या दिवशी यूएसच्या सीमा मेहता, दुसऱ्या दिवशी पुण्याच्या प्राजक्ता राज तर तिसऱ्या दिवशी महागामीचे सादरीकरण रसिकांना संमोहित करणारे ठरले. तिन्ही दिवशी कथ्थकचे वैविध्यपूर्ण सादरीकरण यामध्ये अनुभवता आले. महागामीच्या कलावंतांनी आपल्या सादरीकरणाची सुरुवात 'आंगिकम'ने केली. नृत्याचे आद्यगुरू शिवशंकर यांना ही प्रस्तुती अर्पित होती. वेरूळ लेण्यांतील शिल्पांमध्ये असलेल्या शिवशिल्पांच्या नृत्य भंगिमा यामध्ये दाखवण्यात आल्या. आंगिक अभिनय दाखविणाऱ्या या प्रस्तुतीत शिववंदना करण्यात आली.

'किरवाणी तराना' या प्रस्तुतीत उत्तर भारतीय कथ्थक शैलीचे, तर किरवाणी रागात निबद्ध ही रचना रसिकांना पदलालित्याचे निराळेच दर्शन घडवले. महागामीच्या साधना सामर्थ्य असलेल्या नृत्यांगनांचा रंगमंचावरील वावर निराळीच अनुभूती देणारा होता. नृत्यावरील पकड, सादरीकरणाची नजाकत रसिकांशी आंतरीपर्यंत संवाद साधणारी होती.

'सावरा गिरिधर मोहे भाये रे' ही पं. बिरजू महाराजांची रचना पार्वती दत्ता यांनी नृत्यात बसविली होती. श्रीकृष्ण आणि गोपिका यांच्या सौंदर्यपूर्ण नात्याची नजाकत सांगणारे हे नृत्य होते. 'तीन ताल'मध्ये १६ मात्रांच्या या रचनेत तुकडे, तिहाई अशी कथ्थकची तंत्रशुद्ध बाजू दाखविण्यात आली.

१५ व्या शतकात रचण्यात आलेले पारंपरिक 'निरातत ढंग' कथ्थकचा आंतरिक भाव दाखविणारे होते. पं. बंदादिन महाराज यांनी लिहिलेली ही रचना होती. रूपक तालातील या सौंदर्यपूर्ण रचनेला रसिकांनी भरभरून दाद दिली. पदलालित्य, हस्तमुद्रा भावाभिनयाचा विलक्षण संमोहन असलेला 'सुफराण' हा अतिशय ऊर्जापूर्ण नृत्यप्रकार सादर करत नृत्यांगनांनी रंगमंचाचा निरोप घेतला.

### पुढील सादरीकरण

महागामीच्या शारंगदेव सभागृहात शुक्रवार १४ नोव्हेंबरला सायंकाळी ७.३० वाजता होईल. परदेशी पाहुण्यांसह स्थानिक रसिकांनीही याचा आनंद घ्यावा असे आवाहन महागामीच्या संचालिका पार्वती दत्ता यांनी केले आहे.